मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३६ ■ शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514



त्वरित पत्रकार पाहिजेत !

महाराष्ट्र व देशासह जगभरात डिजिटल माध्यमातून पोहचणारे दैनिक

दैनिक युवक आधार मराठी

महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका, जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा, विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत

अधिक माहिती साठी संपर्क

श्री संतोष शिवदास आमले

संपादक - ९२२०४०३५०९





# राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदांचे आरक्षण जाहीर

## ▶▶ १५ महानगरपालिकांमध्ये महिला होणार महापौर

**दैनिक युवक आधार**


**मुंबई, प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदाची आरक्षणाची सोडत नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली.

पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून २९ महापालिकांपैकी १५ महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.

राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकच पद आरक्षित होत आहे. नियमातील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी पद देय होत नाही. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३ पदे आरक्षित झाली असून, त्यापैकी २ पदे अनुसूचित जाती (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत.

नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी ८ पदे आरक्षित झालेली असून, त्यापैकी ४ पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत.

उर्वरित १७ महानगरपालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी ९ पदे येत असून, ८ पदे खुला (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आहेत.



**महापौर पदासाठी आरक्षण**

अनुसूचित जमातीसाठी राखीव महापालिका – कल्याण-डोंबिवली

अनुसचित जातीसाठी राखीव महापालिका - ठाणे (सर्वसाधारण), जालना (महिला), लातूर (महिला).

नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला आरक्षण) - जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर, अकोला.

नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) – पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर, उल्हासनगर.

सर्वसाधारण महिला आरक्षण – पुणे, धुळे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा-भाईंदर, नागपूर, नाशिक.

सर्वसाधारण प्रवर्ग - छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, भिवंडी-निजामपूर.

## () थोडक्यात ()

### नाशिककरांवरील करवाढ 'स्थायी' अभावी टळली



**नाशिक :** कुठलीही कर व दरवाढ करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. करवाढीचा प्रस्ताव स्थायी समितीवर २८ फेब्रुवारीपूर्वी मंजूर होणे बंधनकारक आहे. मात्र, सध्या महापालिकेची निवडणूक झाली असली तरी महापौर निवड आणि त्यानंतर स्थायी समितीच्या गठणात फेब्रुवारीचा महिना जाणार असल्याने महापालिकेचे २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आयुक्तांकडून थेट महासभेला सादर केले जाण्याची शक्यता आहे.

### दोन लाख 34 हजार 400 रुपयांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** जुन्या मशीन पावडर कोटिंग करून देतो असे सांगून दोन लाख 34 हजार रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारून नवीन आणि कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी प्रशोध पाणीकर आणि यामिनी पाणीकर (राहणार एनआरआय कॉम्प्लेक्स,सिवूड) यांच्या विरोधात 20 जानेवारी रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.अल्ताफ पठाण हे खारघर सेक्टर 40 येथे राहत असून ते नवीन जिमच्या साहित्याच्या शोधात होते. प्रशोध पाणीकर यांच्यावर त्यांनी फोनवर बोलणे केले. यावेळी जुन्या पंधरा मशीनपैकी सात मशीन बदलून नवीन देणार आणि उर्वीरत आठ मशीन पावडर कोटिंग करून देणार असल्याचे ठरले. यावेळी बिग बॉय फिटनेस नावाची कंपनी असल्याचे खोटे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला आणि दोन लाख 34 हजार 400 रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारले. मात्र नवीन मशीन तसेच पावडर कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूक केली.

### पाच वर्षीय मुलाच्या गळ्यातील धाग्यातील सोन्याचे पान चोरले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पाच वर्षीय मुलगा खेळत असताना त्याच्या गळ्यातील काळा धागा कापून सोन्याचे पान चोरून नेल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात 20 जानेवारी रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुनील डोंबाळे हे कळंबोली, सेक्टर 1 येथे राहत असून त्यांचा पाच वर्षीय मुलगा हा घरासमोर गल्लीत खेळत होता. यावेळी अनोळखी इसमाने त्याच्या गळ्यातील काळा धागा कापला आणि त्यातील साडेचार हजार रुपयांचे सोन्याचे पान चोरून नेले.

# शनिवार वाड्याचा २९४वां वर्धापन दिन

## वर्षातून एकदाच उघडला जातो दिल्ली दरवाजा

**दैनिक युवक आधार**

**पुणे, प्रतिनिधी :**

मराठा साम्राज्याच्या वैभवाचं प्रतिक असलेला शनिवारवाडा आजही पराक्रम, शौर्य आणि स्वाभिमानाची साक्ष देतोय. शनिवारवाड्याचा प्रत्येक दगड आणि दरवाजा त्याच्या भव्यतेची अनुभूती देतात. उत्तर दिशेला असणारा शनिवारवाड्याचा मुख्य दिल्ली दरवाजाची उंची आणि भक्कमता आजही पर्यटकांना अचंबित करून सोडते. मराठा साम्राज्य आणि पेशवे काळातील इतिहासाच्या पाऊलखुणा आजही शनिवारवाडा आपल्या अंगाखांद्यावर मिरवतोय. इतिहासाचा साक्षीदार बनून अनेक सुखाचे आणि पानिपतच्या तिसऱ्या युद्धासारखे प्रसंग अनुभवणाऱ्या शनिवारवाड्याचा २९४वा वर्धापन दिन थाटात साजरा करण्यात आला.



**वर्षातून एकदाच उघडला जातो दिल्ली दरवाजा :** थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानतर्फे पुणे शहराचं वैभव असलेल्या शनिवारवाड्याचा गुरुवारी २९४वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शनिवारवाड्याचा ऐतिहासिक दिल्ली दरवाजा उघडण्यात आला. विशेष बाब म्हणजे हा दिल्ली दरवाजा वर्षातून एकदाच उघडला जातो. गुरुवारी सर्व मान्यवरांच्या हस्ते दिल्ली दरवाजा उघडण्यात आला. यावेळी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे आणि श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले.

**सातमजली शनिवारवाडा उभारणार :** "छत्रपती शिवाजी महाराज यांना स्मरून बाजीराव पेशवे यांनी याच शनिवारवाड्यापासून अटकेपार झेंडा फडकवला. आज शनिवारवाड्याचा २९४ वा वर्धापन दिन आहे. २०१२ साली मी स्थायी समितीचा अध्यक्ष असताना शनिवारवाडा सातमजली व्हावा यासाठी प्रस्ताव दिला होता. यासाठी माझा पाठपुरावा सुरू असून शनिवारवाड्याच्या ३००व्या वर्धापन दिनापर्यंत सातमजली शनिवारवाडा उभा करणार," असं आमदार हेमंत रासने यांनी सांगितलं.

# लाडक्या बहिणींची पुन्हा झाडाझडती; २२ ते २५ लाख महिलांच्या ई केवायसीची तपासणी होणार


**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांचा शोध घेण्यासाठी पात्र महिलांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यत ई केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, ई केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडल्याचे निदर्शनाला आले.




त्यामुळे २२ ते २५ लाख महिलांच्या ई केवायसीची अंगणवाडी सेविकांमार्फत पडताळणी करा, असे स्पष्ट आदेश महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याआधी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली.



माघी गणेशोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी न्हावे खाडी मंदिरात श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

( दैनिक युवक आधार)

# प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय..!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** 'सर्वांसाठी न्याय.. जलद न्याय' या तत्वावर राज्य शासन काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायदान साखळीतील कमतरता दूर करण्यात येत आहे. नवीन फौजदारी कायद्याअंतर्गत जलद न्यायाला प्राधान्य दिले असून त्यानुसार न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. त्यामुळे न्यायदानाची प्रक्रिया जलद झाली आहे.

न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचित केले. तसेच त्यांनी नियमित आढावा घेत या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची प्रक्रिया



गतिमान केली. संचालनालयाकडील प्रयोगशाळांमध्ये २०२५ मध्ये एक लाख ८१ हजार प्रकरणे प्रलंबित होती. तसेच दोन लाख ९४ हजार इतकी प्रकरणे आवक झाली. संचालनालयाने विशेष मोहिम राबवून डिसेंबर २०२५ अखेर तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करून ७९ हजार ५४२ इतकी प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी केली आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत सर्व विभागांच्या प्रचलित मानकांमध्ये वाढ करून संचालनालयातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांचेकडून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत कामाचे जादा तास वाढवून, शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली.

संचालनालयातील कार्यरत मनुष्यबळाकडून कमीत कमी दोन लाख ते दोन लाख १५ हजार प्रकरणांचा निपटारा करण्याची क्षमता असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. प्रलंबित प्रकरणांपैकी एक लाख ०२ हजार ४१३ इतक्या जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यात संचालनालयाला यश आले आहे.

डिसेंबर २०२५ अखेर प्रलंबित प्रकरणांपैकी ' कन्व्हेक्शनल फॉरेन्सीक' या विभागाने तीन लाख ९६ हजार २७५ इतक्या प्रकरणांचा निपटारा केला आहे. तसेच या विभागात २७ हजार ५२४ आवक प्रकरणांची संख्या असून फेब्रुवारी २०२६ पासून ज्याa दिवशी प्रकरण आवक होईल, त्याच दिवशी प्रकरणांचे विश्लेषणाचे काम सुरू होईल,

त्यामुळे दिवसेंदिवस प्रकरण प्रलंबित असण्याची बाब इतिहासजमा होऊन पिडितांना जलदगतीने न्याय मिळण्याची व्यवस्था निर्माण होत आहे.

# ठाण्यात माघी गणेशोत्सवासाठी पर्यावरणपूरक विसर्जन व्यवस्था


## मुर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, टाकीची व्यवस्था

**दैनिक युवक आधार**

**ठाणे, प्रतिनिधी :**

ठाणे शहरात माघी गणेशोत्सव साजरा करण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांपासून वाढु लागले असून यंदा ही शहरात घरगुती तसेच सार्वजनिक माघी गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. हा उत्सव पर्यावरण पुरक साजरा व्हावा यासाठी पालिका प्रशासनाने उपाययोजना केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन गणेश मुर्ती विसर्जनासाठी शहरात कृत्रिम तलाव, विसर्जन टाकी अशी व्यवस्था उभारण्यात आली आहे.

माघी गणेशोत्सवाला २२ जानेवारीपासून सुरूवात झाली असून पुढील १० दिवस हा उत्सव साजरा होणार आहे. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाने प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्ती बनविणाऱ्या मूर्तिकार आणि विक्रेत्यांना महत्वाच्या सुचना केल्या होत्या. मूर्ती विक्री करताना त्याबाबत विक्री रजिस्टर ठेवणे बंधनकारक करण्यात आले होते. तसेच मंडळाकडून बसविण्यात येणारी मुर्ती प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्ती आहे कि नाही, मुर्तीकारांकडून मूर्तींची उंची किती आहे, याची माहिती संकलित करुन त्यानुसार पालिकेने विसर्जनाचा आराखडा



आणि व्यवस्था निर्माण केला आहे. यानुसार, महापालिकेने पर्यावरणपूरक विसर्जनासाठी विशेष व्यवस्था केली आहे.

कृत्रिम तलाव, टाकी विसर्जन व्यवस्था आणि खाडी घाट येथे विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. २ ते ३ फूट उंचीच्या मूर्ती टाकीमध्ये, ३ ते ६ फूट मूर्ती कृत्रिम तलावात तर ६ फूटांपेक्षा मोठ्या मूर्तींचे विसर्जन खाडीमध्ये करण्याच्या सूचना सर्व प्रभागसमिती स्तरावरुन सर्व सार्वजनिक मंडळांना देण्यात आल्या आहेत. मूर्ती विसर्जन करण्यात येणारे पाणी ठाणे महापालिकेतर्फे शुध्दीकरण करून नंतर जलस्त्रोतात सोडले जाणार असल्याचे मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी सांगितले.

# आदीसेतू जनसंवादावर जिल्हाधिकाऱ्यांचा थेट दणका!

## रस्ते, पाणी, रोहयो, वस्तीगृह, अन्नधान्य, नेटवर्क प्रश्नांवर कडक ॲक्शन – वेळेत काम नाही तर जबाबदारी ठरवणार!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** जानेवारी आदीसेतू जनसंवाद उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील प्रत्येक समस्या वेळेत मार्गी लागली पाहिजे, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आणि तात्काळ कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजेवाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत श्री. कुंभेजकर बोलत होते. त्यांनी यावेळी विविध गावांतील नागरिकांनी मांडलेल्या समस्या, त्यावर झालेली व होणारी कार्यवाही याबाबत सविस्तर सूचना दिल्या.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, महसूल उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, उपजिल्हाधिकारी दीपक बाजड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कालीदास तापी, कृषी उपसंचालक हिना शेख, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, महिला व बालकल्याण कार्यक्रम अधिकारी संजय जोल्हे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

१७ डिसेंबर २०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथील अधिकाऱ्यांनी वाशिम जिल्ह्यातील विविध गावांना दिलेल्या क्षेत्रभेटीदरम्यान नागरिकांकडून रस्ते, पाणीपुरवठा, रोजगार, आरोग्य, शिक्षण, अन्नधान्य व मूलभूत सुविधांबाबत अनेक मागण्या मांडण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शेअर करण्यात आलेल्या गुगल शीटमध्ये संबंधित विभागांनी आपल्या स्तरावर केलेल्या अनुपालनाची सविस्तर माहिती तातडीने



अद्यावत करावी, असेही निर्देश देण्यात आले.

जिल्ह्यात स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हंगामी वस्तीगृह सुरू करण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, त्या ठिकाणी प्रत्यक्ष तपासणी करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. एकांबा गावामध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियमित भेटी, खडी–मोहरी मार्गावरील उखडलेला रस्ता पक्का करण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी, तसेच स्मशानभूमी बांधकाम व रस्त्यालगत नाल्यांच्या अभावाबाबत ग्रामपंचायतीसोबत नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले.

रोहयो अंतर्गत संबंधित गावांमध्ये किती कामे पूर्ण झाली आहेत, किती सुरू आहेत आणि जॉब कार्डवर किती लाभार्थी कार्यरत आहेत, याची स्थलांतर कालावधीतील महिना-निहाय माहिती संकलित करण्यावर भर देण्यात आला. धमधमी, ता. मालेगाव येथील आदिवासी कुटुंबांच्या संयुक्त खात्यांबाबत व खातेफोडीच्या प्रश्नाची इतर गावांमध्येही तपासणी करून तहसीलदारांच्या माध्यमातून कॅम्प आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले.

बिबे फोडणाऱ्या महिलांना हॅन्डग्लोज व इतर सुरक्षासाहित्य दिले जाते की नाही, याची सखोल तपासणी करण्याच्या सूचना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे यांना देण्यात आल्या. धमधमी येथील जल जीवन मिशनचा विषय प्रलंबित असला तरी पाणीटंचाई निर्माण होणार नाही, याची खात्री ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने करावी, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच धमधमी ते वरदरी खुर्द रस्ता प्रस्तावित करण्याबाबतही निर्देश देण्यात आले.

निकृष्ट दर्जाच्या धान्याबाबत आलेल्या तक्रारींची चौकशी करून आवश्यक कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी करावी, शेतकऱ्यांना रेल्वे पुलाखालून शेतात जावे लागते त्या ठिकाणी रस्त्याचे पक्के किंवा कॉंक्रीटीकरण करण्यासाठी रेल्वे विभागाकडे पाठपुरावा करावा, असे आदेश देण्यात आले. मौजे विळेगांव येथील नेटवर्क समस्येचा विषय दूरसंचार समितीच्या बैठकीत मांडून त्याबाबतचा अनुपालन अहवाल जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक, डीआयटी यांनी सादर करावा, असेही सांगण्यात आले.

अंगणवाड्यांमध्ये मुदतबाह्य मालाचा पुरवठा होत नाही, याची खात्री करून घेण्यासह ज्या विभागांची माहिती अद्याप गुगल शीटवर भरलेली नाही, त्यांनी ती तातडीने भरावी, असे निर्देश देत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी उपस्थित यंत्रणा प्रमुखांना जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले.या बैठकीला विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# के. के. वाघ क्रिकेट संघाची राज्यस्तरीय स्पर्धेकडे गरुडझेप

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** येवला येथील एम.आय.टी. कॉलेज येथे पार पडलेल्या शालेय विभागीय १९ वर्ष वयोगटातील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज, भाऊसाहेबनगर यांच्या संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्यात धुळे संघाचा पराभव करून दणदणीत विजय मिळविला.

अंतिम सामन्यात के. के. वाघ संघाने अवघ्या ५ षटकांत ८४ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरादाखल धुळे संघाला ५ षटकांत केवळ ६० धावांपर्यंत मजल मारता आली. त्यामुळे के. के. वाघ संघाने सामना जिंकत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

या विजयासह के. के. वाघ क्रिकेट संघाची राज्यस्तरीय शालेय क्रिकेट



स्पर्धेसाठी निवड झाली असून ही संस्था व परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

संघनायक ओम पाटील याच्या नेतृत्वाखाली वैभव बोरसे, वेदांत गवारे, क्षितिज पवार, राज आहेर, किरण माळी, विशाल गोयेकर, ऋषिकेश गोयेकर, आदित्य वाघ, संकेत फापाळे, वेदांत सोनवणे, सिद्धेश खैरे, संकेत रोटे यांनी नेत्रदीपक कामगिरी करत संघाला विजयश्री मिळवून दिली.

या यशाबद्दल खेळाडू व क्रीडामार्गदर्शक गोविंद कांदळकर यांचे के. के. वाघ शिक्षण संस्था चे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त शकुंतलाताई वाघ, सचिव के. एस. बंदी, जनसंपर्क प्रमुख अजिंक्य वाघ, अधीक्षक श्रीकांत ढवळे, शा.व्य.स. अध्यक्ष शिवाजी नाठे, समन्वयक यशवंत ढगे, प्राचार्य दिवाकर शेजवळ, मुख्याध्यापिका उज्वला तासकर, प्राचार्य बाळासाहेब मोंढे, उपमुख्याध्यापिका सुनीता वडघुले, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, पालकवर्ग यांनी अभिनंदन करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

के. के. वाघ क्रिकेट संघाच्या या यशामुळे भाऊसाहेबनगर परिसरात क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून राज्यस्तरावरही संघाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांची लोहारी येथील शाळेला भेट

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोट प्रतिनिधी :** अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत लोहारी येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थी उपस्थिती तसेच पायाभूत सुविधांचा आढावा घेतला. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक वर्गखोल्यांना भेट देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारत त्यांचे वाचन, लेखन कौशल्य तपासून विद्यार्थ्यांचे



व शिक्षकांच्या कामगिरीचे कौतुक केले. शाळेने नव्याने 'जर्मन भाषा बोलूया' हा उपक्रम सुरू केला. याप्रसंगी शाळेतील काही विद्यार्थ्यांनी जर्मन भाषेत स्वतःचा परिचय करून दिला. याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शाळेच्या शिक्षिका सोनाली निचळ यांचे अभिनंदन करून कौतुक केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व पटसंख्या वाढीसाठी असेच नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याच्या सूचना केल्या. शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, सर्व भौतिक सुविधा, परसबाग यांची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. याप्रसंगी त्यांच्या सोबत सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत हरिनारायण परिहार, राजेश खुमकर गटविकास अधिकारी अकोट , विस्तार अधिकारी मदनसिंग बहुरे, लोहारी गावच्या सरपंच पूजाताई म्हैसने, ग्रामसेवक शैलजा पाटील, शा. व्य. समिती अध्यक्ष दिनेश वानखडे, मुख्याध्यापक नितीन धोरण, शिक्षिका सोनाली निचळ, सोनाली उज्जैनकर, रुपाली ढवळे तसेच बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या भेटीमुळे शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# न्यू इंग्लिश स्कूल चांदोरीत पर्यावरण जागृती अभियान : पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची व्यवस्था

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** चांदोरी येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, चांदोरी येथे पर्यावरण जागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले. या अभियानाअंतर्गत पक्ष्यांचे संवर्धन व संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यात आली.

विद्यालयाचे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा विभागाचे प्रमुख घनश्याम मोरे यांनी विद्यार्थ्यांना पक्ष्यांसाठी घरटी तसेच पिण्याच्या पाण्याची सोय करता येईल अशी साधने तयार करून आणण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत




विद्यार्थ्यांनी प्लास्टिकच्या वापरलेल्या पाण्याच्या बाटल्या, वापरलेले तेलाचे ड्रम, नारळाच्या करवंट्या आदी साहित्यापासून पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची साठवण करता येईल अशी आकर्षक घरटी तयार केली.

विद्यालयाचे कलाशिक्षक गणेश गायकवाड यांनी सर्व घरटी सुंदर रीतीने सजवली. शाळेच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही घरटी शाळेच्या परिसरातील प्रत्येक झाडावर लावण्यात आली.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब कापडणीस यांनी “चिमणी वाचवा, पक्षी वाचवा” या अभियानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. तसेच मोबाईल टॉवर्समुळे पक्ष्यांची घटत चाललेली संख्या ही पर्यावरण संतुलनासाठी अत्यंत घातक असल्याचे मत विद्यालयाचे पर्यवेक्षक व राज्य पुरस्कार विजेते सृष्टी मित्र जयवंत ठाकरे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला उपमुख्याध्यापिका संगीता भदाणे, पर्यवेक्षक मनोज महाजन, कलाशिक्षक गणेश गायकवाड, योगिता गोरडे, विष्णू कोरडे, क्रीडा विभाग प्रमुख विशाल गोसावी, गुणवत्ता कक्ष प्रमुख पंकज सरोदे यांच्यासह जितेंद्र ठोके, दीपक पगार, निलेश गावित, संदीप शेवाळे, अर्चना पवार, स्वाती सोमवंशी, आकाश टर्ले, रमेश गायखे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# उरण, पनवेलच्या ग्रामीण भागात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

## महेंद्रशेठ घरत यांनी घेतले गावोगावी गणरायाचे दर्शन

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर :** माघ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्थीला माघी गणेशोत्सव साजरा केला जातो. याच दिवशी गणेशाचा जन्म झाला, अशी पौराणिक कथा सांगितली जाते. त्यामुळे पनवेल, उरण तालुक्यातील ग्रामीण भागात माघी गणेशोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत हे गणरायाचे निस्सीम भक्त आहेत. दर महिन्यात



ते मुंबईतील सिद्धिविनायकाचे दर्शन आवर्जून घेतात. गणरायाच्या प्रेमापोटी त्यांनी मोरावे गावातील तरुणांनी समुद्रात बांधलेल्या मंदिरात भक्तांना सुलभ दर्शन व्हावे म्हणून लाँच भेट दिली आहे. त्याद्वारे गणेशभक्तांना विनामूल्य प्रवास घडवला जातो.

गुरुवारी (ता. २२) माघी गणेशोत्सवानिमित्त त्यांनी मोरावे, मुर्बा गणपती, गव्हाण, न्हावाखाडी, उरण, चिरनेर, विंधणे, बेलपाडा, मोठी जुई, ओवळे, धुतूम आदी गावांत जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गरिबातल्या गरिबाला सुख-समृद्धी लाभू दे, अशी मनोमन प्रार्थना केली. यावेळी त्या त्या गावच्या ग्रामस्थांनी त्यांचा यथोचित सन्मानही केला.

# वाढदिवसानिमित्त आजीनाथ गवळी यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

## योगीताने बनवले स्वतःच्या रत्काचे पेंटींग

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांचा वाढदिवस तालुक्यात अनेक ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आ.सुनिल दादा धांडे, राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष मा. महेबुब भाई शेख यांचेसह अनेक अधिकारी,पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांना प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष व फोनद्वारे शुभेच्छा दिल्या.त्यांच्यावर विविध स्तरातुन शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. राज्याचे ग्रामविकासमंत्री मा. ना. जयकुमार गोरे, माजी. सर्व सामान्यांसाठी गेल्या पंचवीस वर्षा पासून



सामाजिक कार्यांच्या माध्यमातुन काम करणारे सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांचा ४७ वा वाढदिवस अनेक ठिकाणी साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी विविध पक्ष,संघटना, मित्रपरिवार व चाहते यांनी शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांची कन्या स्वच्छतादुत कु. योगीता गवळी स्वतःच्या रत्काने पेंट केलेला फोटो आपल्या लाडक्या पित्याला वाढदिवसानिमित्त भेट देऊन आगळ्या वेगळ्या शुभेच्छा दिल्या.

**ग्रामविकास मंत्री मा. ना. जयकुमार गोरे यांच्या पत्राव्दारे शुभेच्छा**

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री व नायगाव येथील सावित्रीमाई फुले स्मारकाचे प्रणेते मा. ना.जयकुमार भाऊ गोरे यांनी निवडणूकीच्या धावपळीत असतांना सुद्धा वेळात वेळ काढुन विशेष पत्र पाठवुन आजीनाथ गवळी यांना शुभेच्छा दिल्या.

# सिल्लोडमध्ये निवडणूक 'अलर्ट'; सहा मार्गांवर प्रशासनाची 'फिल्डिंग'!

## जि.प., पंचायत समितीसाठी 'SST' तैनात; संशयास्पद हालचालींवर करडी नजर

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या रणधुमाळीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन रोखण्यासाठी सिल्लोड निवडणूक प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. निलेश श्रीराम अपार यांच्या आदेशानुसार, तालुक्यातील सहा प्रमुख प्रवेशद्वारांवर आणि मार्गांवर 'स्थैतिक संनिरीक्षण पथके' (SST) कार्यान्वित करण्यात आली आहेत. या पथकांमार्फत आता २४ तास येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक वाहनावर आणि संशयास्पद हालचालींवर करडी नजर ठेवली जाणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) डॉ. निलेश श्रीराम अपार, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संजयकुमार देवराये व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी रत्नाकर पगार यांच्या आचारसंहिता कक्षाने तालुक्यातील सहा मोक्याच्या ठिकाणांची तपासणी नाके म्हणून निवड केली आहे. यामध्ये १) जळकी बाजार फाटा (शिवना रोड), २) अजिंठा घाट (जळगाव रोड), ३) म्हसला फाटा (भराडी रोड), ४) घाटनांद्रा घाट (पाचोरा रोड), ५)



पिंपरी फाटा (भोकरदन रोड) आणि ६) वरखेडी फाटा (छत्रपती संभाजी नगर रोड) या ठिकाणांचा समावेश आहे.

या प्रत्येक तपासणी नाक्यावर दोन शासकीय अधिकारी, एक पोलीस कर्मचारी आणि एक फोटोग्राफर अशा चार अनुभवी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक काळात होणारी अवैध रोख रक्कम, मद्य साठा, शस्त्रे किंवा मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंना रोखण्यासाठी ही पथके सज्ज झाली आहेत. विशेष म्हणजे, पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक तपासणीचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येणार आहे.

आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर कोणत्याही दबावाशिवाय कडक कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाने दिले आहेत. या कडक नाकाबंदीमुळे निवडणुकीत गैरप्रकार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# सामान्य गुंतवणूकदारांसाठी नवे ट्रेडिंग तंत्रज्ञान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** शेअर बाजारात व्यवहार करणाऱ्या सामान्य गुंतवणूकदारांसाठी उपयोगी ठरणारे नवे ट्रेडिंग तंत्रज्ञान डिफाइनएज सिक्युरिटीज ब्रोकिंग प्रा. लि. यांनी मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत सादर केले. या नव्या ट्रेडिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून शेअर बाजारातील व्यवहार अधिक सोपे, शिस्तबद्ध आणि नियमांवर आधारित करता येणार आहेत.

आतापर्यंत अनेक गुंतवणूकदार अंदाजांवर किंवा भावनांवर आधारित ट्रेडिंग करत होते. मात्र, या नव्या तंत्रज्ञानामुळे ठराविक नियमांनुसार आणि ठरवलेल्या रणनीतीनुसार व्यवहार करता येणार असल्याचे कंपनीने सांगितले. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सहसंस्थापक प्रशांत शाह यांनी या प्लॅटफॉर्मची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या प्रणालीमुळे इंट्राडे तसेच दीर्घकालीन (पोजिशनल) ट्रेडिंग, शेअर्स, फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये एकाच ठिकाणी करता येणार आहे. विविध चार्ट, किंमत चढ-उतार आणि ऑप्शन चेनच्या आधारे व्यवहार आखता येतील.

या तंत्रज्ञानाचा उपयोग करून गुंतवणूकदार आपली ट्रेडिंग रणनीती स्वयंचलित करू शकतात. त्यामुळे मानवी चुका कमी होतील आणि व्यवहारात शिस्त राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. शेअर बाजारात यशस्वी होण्यासाठी अंदाज नव्हे तर नियम आणि शिस्त महत्त्वाची आहे. आमचा हा नवा प्लॅटफॉर्म सामान्य गुंतवणूकदारांनाही व्यावसायिक पद्धतीने ट्रेडिंग करण्यास मदत करेल.

# श्रीवर्धन तालुक्यात जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकीसाठी अर्जांची रणधुमाळी

## अंतिम दिवशी उमेदवारांची गर्दी, सर्व पक्षांकडून शक्तीप्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यात येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी पक्षांकडून मोठी धावपळ पाहायला मिळाली. सकाळपासूनच तहसील कार्यालय परिसरात इच्छुक उमेदवार, कार्यकर्ते व समर्थकांची गर्दी उसळली होती.



सर्व प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज दाखल केल्यामुळे आगामी निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. येत्या काही दिवसांत कोण अर्ज मागे घेणार, कुणाची युती होणार आणि कोणत्या मतदारसंघात सरळ लढत होणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

निवडणूक विभाग 51 – बोर्ली पंचतन (अनुसूचित जमाती)

1. शारदा देवजी नाईक – भाजप
2. वसंती मंगेश गुणाजी – राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)
3. पाभरेकर मंगल देवेंद्र – शिवसेना

निवडणूक विभाग 52 – आराठी

1. अर्पिता उदय पाटील – भाजप (ना.मा.प्र.)
2. हर्षदा दिलीप सालदूरकर – भाजप (ना.मा.प्र.)
3. दीक्षा प्रदीप टाकळे – अपक्ष (ना. मा.प्र.)
4. अक्षदा अविनाश कोळंबेकर – शिवसेना (सर्वसाधारण)
5. वैष्णवी मंगेश कोमना – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (ना.मा.प्र.)
6. मेमुना इकबाल राऊत – काँग्रेस (सर्वसाधारण)
7. संजना संदेश गुजर – अपक्ष (सर्वसाधारण)

निर्वाचक गण क्रमांक 101 – दिघी

1. ॲड. जयदीप दीपक तंबूटकर – भाजप (ना.मा.प्र.)
2. आशुतोष अंकुश पाटील – भाजप (ना.मा.प्र.)
3. कमाल युसुफ गीते – भाजप (सर्वसाधारण)
4. सुचिन नंदाकर कीर – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (सर्वसाधारण)
5. विनोद लहू साळवे – शिवसेना (उबाठा)
6. किशोर बबन बिराडी – मनसे (ना. मा.प्र.)
7. हरिदास चंद्रकांत बेडेकर – शिवसेना
8. प्रकाश महादेव गोवारी – अपक्ष
9. प्रथमेश सदानंद नाक्ती – शिवसेना
10. कल्पेश तुकाराम शेलार – अपक्ष

निर्वाचक गण क्रमांक 102 – बोर्ली पंचतन

1. निलेश आत्माराम खेडेकर – भाजप (ना.मा.प्र.)
2. निलेश अनंत वाघे – भाजप (सर्वसाधारण)
3. योगेश बाळाराम गायकर – शिवसेना (उबाठा)
4. रमेश दत्ताराम घरत – काँग्रेस
5. विजय सुदाम तोडणकर – अपक्ष
6. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर – शिवसेना

निर्वाचक गण क्रमांक 103 – आराठी

1. वैजयंती विनायक पारधी – भाजप (ना.मा.प्र.)
2. स्वप्नाली संतोष मोहिते – भाजप
3. श्रुतिका श्रीकांत शेलार – शिवसेना
4. पूजा प्रशांत शिंदे – भाजप
5. नुहा जावेद डांगू – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

निर्वाचक गण क्रमांक 104 – बागमांडला

1. अर्पिता उदय पाटील – भाजप (ना.मा.प्र.)
2. हर्षदा दिलीप सालदूरकर – भाजप (ना.मा.प्र.)
3. वर्षा नितीन जोशी – शिवसेना
4. प्रचिती प्रथमेश बारे – शिवसेना (उबाठा)
5. अस्मिता प्रदर्शन चोरगे – काँग्रेस (ना.मा.प्र.)

अर्ज भरण्याच्या प्रक्रियेनंतर आता सर्वच पक्षांकडून शक्तीप्रदर्शन झाले असून, खरी कसोटी येत्या माघारीच्या दिवसात लागणार आहे.

कोणाची युती होते, कुठे मैत्रीपूर्ण लढत होते आणि कुठे सरळ सामना रंगतो, यावर निवडणुकीची दिशा ठरणार आहे.

तालुक्यातील मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार, हे आता पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# राजेंद्र लहाने यांची रवळगाव गटातून जिल्हा परिषद निवडणूक मैदानात पुन्हा एन्ट्री

**दैनिक युवक आधार**

**सेलू /प्रतिनिधी :** रवळगाव गटातून शांत, संयमी स्वभावासाठी ओळखले जाणारे माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष राजेंद्र लहाने यांनी पुन्हा एकदा जिल्हा परिषद निवडणूक रिंगणात उतरल्याने परिसरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रशासकीय कामाचा प्रदीर्घ अनुभव, अभ्यासू नेतृत्व आणि सर्वसामान्य जनतेसाठी सदैव मदतीस तत्पर राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे.



जिल्हा परिषद उपाध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत प्रशासन आणि जनतेमधील दुवा म्हणून प्रभावी भूमिका बजावली. विकासाभिमुख दृष्टिकोन, संयमित नेतृत्वशैली आणि संवाद कौशल्यामुळे त्यांना विविध स्तरांतून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

रवळगाव गटातील नागरिकांच्या प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा करणारे, अडचणीच्या काळात मदतीस धावून जाणारे लोकप्रतिनिधी म्हणून राजेंद्र लहाने यांना ओळखले जाते. त्यांच्या पुनरागमनामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत या गटातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# चिमुकल्यांच्या 'आनंद नगरी'त व्यवहारज्ञानाचा गजबजाट; ज्ञानदीप इंग्लिश स्कूलमध्ये 'हळदी-कुंकू' व आनंद मेळावा उत्साहात!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** पुस्तकी ज्ञानाला व्यावहारिक अनुभवाची जोड देण्यासाठी म्हसला (खुर्द) येथील ज्ञानदीप इंग्लिश स्कूलमध्ये 'आनंद नगरी' आणि 'हळदी-कुंकू' समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने आणि विविध खाद्यपदार्थांच्या सुगंधाने शालेय परिसर अक्षरशः बहरून गेला होता. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ पदार्थांचा आस्वादच घेतला नाही, तर प्रत्यक्ष खरेदी-विक्रीतून अर्थकारणाचे पहिले धडे गिरवले.



कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक दौलत पालोदकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुभाष पवार, विजय राजपूत, आनंद मंडाडे, मनीषा पवार, बाळू पवार, अतुल वाघ, रघुनाथ मुढे, अनिल बनकर, अतुल काटकर, दिपाली पालोदकर, दिव्या बेनाडे, रुपाली बनकर यांसह सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात लावलेल्या विविध स्टॉल्सनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये इडली-डोसा, समोसा, कचोरी, पापड, गुलाबजाम, पाणीपुरी, ढोकळा, इडली-सांभार, पोहे यांसारख्या चविष्ट पदार्थांसह ताज्या भाजीपाल्याची विक्रीही करण्यात आली. 'ग्राहक' बनून आलेल्या पालकांशी संवाद साधताना आणि पैशांचा हिशोब ठेवताना चिमुकल्या विक्रेत्यांचा आत्मविश्वास ओसंडून वाहत होता.

यावेळी आयोजित 'हळदी-कुंकू' समारंभातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडले. केवळ नफा कमावणे हा उद्देश न ठेवता, सहकार्य, नियोजन, सर्जनशीलता आणि श्रमाची प्रतिष्ठा हे गुण विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमाचे पालकांनी उत्स्फूर्त कौतुक केले असून, हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला.

# मालेगावकरांचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय – नूतन नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** (वाशीम) मालेगाव नगरपंचायतीच्या नूतन नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर ओमप्रकाश खुरसडे यांनी मालेगावकरांच्या सर्वांगीण विकासालाच सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. नगरपंचायतीचा कारभार पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख ठेवण्याचा आपला निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले.



मालेगाव शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता मूलभूत सुविधांचा विकास करणे अत्यंत गरजेचे असून, विशेषतः पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, रस्ते, गटार व्यवस्था तसेच सार्वजनिक लाईट व्यवस्थेकडे अधिक लक्ष दिले जाईल, असेही नूतन नगराध्यक्ष खुरसडे यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी नगरपंचायत प्रशासन अधिक सक्रियपणे काम करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.नगरपंचायतीच्या माध्यमातून शासनाच्या विविध विकास योजनांचा लाभ प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. विकासकामांमध्ये कोणताही भेदभाव न करता सर्व प्रभागांचा समतोल विकास साधण्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

नूतन नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांच्या नेतृत्वाखाली मालेगाव शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा मालेगावकर नागरिकांमधून व्यक्त होत असून, येणाऱ्या काळात मालेगाव नगरपंचायतीच्या विकासात लक्षणीय बदल दिसून येईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

# बंडखोर अमर म्हात्रेचे भाजपकडून निलंबन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या गव्हाण जिल्हा परिषद गणाच्या अधिकृत उमेदवाराविरोधात उमेदवारी अर्ज दाखल करून पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल अमर केसरीनाथ म्हात्रे याचे भारतीय जनता पार्टीमधून सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात आले आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टी ही शिस्तबद्ध संघटना असून, पक्षाच्या निर्णयांचे पालन करणे प्रत्येक कार्यकर्त्याला बंधनकारक आहे. मात्र अमर केसरीनाथ म्हात्रे याने स्वतःच्या स्वार्थापोटी निर्णय घेत भाजपच्या अधिकृत उमेदवार निकिता निलेश खारकर यांच्या विरोधात त्यांची पत्नी सुनंदा अमर म्हात्रे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करत पक्षशिस्तीचा भंग आणि बंडखोरी केली आहे. त्यामुळे अमर म्हात्रे याचे पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

# ॲड मा. प्राचार्य पी. एल. गायकवाड यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल येथील सामाजिक कार्यकर्ते महात्मा फुले छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्याचे अभ्यासक माजी प्राचार्य पी. एल गायकवाड यांना भारत मंच ट्रस्ट, संविधान हॉल, दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पी. एल. गायकवाड यांना माननीय सिक्कीम राज्याचे माजी राज्यपाल वाल्मीकी प्रसाद सिंग यांच्या शुभ हस्तेअमेरिका इंटरनॅशनल युनिर्व्हसिटी च्या वतीने सामाजिक कार्याबदद्ल डॉक्टरेट ही पदवी प्रदान करण्यात आली.

या प्रसंगी नॅशनल युथ अवार्डी डॉ. मनीष गवई, पद्मश्री बी. आर. इदाते, सुरेखा लामतुरे आदी मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. पी. एल. गायकवाड हे सु. ए. सो. चे ज्ञानवर्धिनी माध्यमिक विदयालय सावळे येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. ते सध्या सेवानिवृत्त झाले आहेत. शाळा सांभाळत त्यांनी अनेक सेवाभावी संस्था व पदाधिकारी म्हणून काम पाहिले. यापुर्वी पी. एल. गायकवाड यांना राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

शैक्षणिक क्षेत्र याच्यातून सामाजिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय समाजसेवा केलेली आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतर अंदोलनामध्ये लाँग मार्चमध्ये सहभाग व अग्रेसर होते. तसेच म. फुले, छ. शाहुमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून वेळोवेळी नवीन पनवेल येथे व्याख्यानाचे आयोजन करीत असतात. सदर डॉक्टरेट पदवी मिळालेली वार्ता कळताच अनेक प्रतिष्ठीत मान्यवर व्यक्तीनी व समाज सेवा भावी संस्थानी अभिनंदन केले आहे.

# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचा गामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीकरीता भाजप महायुतीला पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची भेट घेऊन आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीकरीता पाठिंबा दर्शवण्याचे पत्र दिले. त्यावेळी त्यांच्यासोबत पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहराध्यक्ष प्रशांत सोनवणे, अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष आसिफ शेख, चंद्रकांत वेळास कर भारत दाताड, समाधान कांबळे, अशोक कदम इत्यादी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



पनवेल तालुक्यातील गव्हाण, वडघर सहित आठ जिल्हा परिषद मतदार संघामध्ये व 16 पंचायत समिती मतदार संघामध्ये स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाच्या वतीने महेश साळुंखे यांनी महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे व तश्या प्रकारचे पत्र त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची भेट घेऊन त्यांना स्वाधीन केलेले आहे. काही दिवसापूर्वी पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सुद्धा स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाने महायुतीला जाहीर पाठिंबा दिलेला होता.

# प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी न्यूईरा हॉस्पिटलला मिळाला शासनाचा परवाना; अत्याधुनिक सुविधा आणि तज्ज्ञ वैद्यकीय पथकासह हॉस्पिटल सज्ज

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई वार्ताहर :** न्यूईरा हॉस्पिटलला आरोग्य विभागाकडून प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यासाठी अधिकृत परवाना मिळाला आहे, ज्यामुळे जिवंत दात्याकडून आणि मृत दात्याकडून यकृत प्रत्यारोपण करणे शक्य होणार आहे. या मंजुरीमुळे यकृत आणि मूत्रपिंडाच्या गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेळीच व जीवनरक्षक उपचार मिळतील आणि या प्रदेशातील अवयव प्रत्यारोपण पायाभूत सुविधा अधिक मजबूत होतील.

प्रत्यारोपणाची गरज ही उपलब्ध पायाभूत सुविधांपेक्षा खूप जास्त आहे आणि रुग्णांना अवयवाच्या प्रतिक्षेत बराच काळ वाट पाहावी लागते. वाशीतील न्यूईरा हॉस्पिटलला मिळालेली ही परवानगी अशा रुग्णांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.




न्युईरा हॉस्पिटलला आता यकृत प्रत्यारोपण करण्याची परवानगी मिळाल्याने, रुग्णाला प्रत्यारोपणाकरिता आता इतरत्र धाव घेण्याची गरज भासणार नाही.

न्युईरा हॉस्पिटल राष्ट्रीय प्रत्यारोपण मानकांची पूर्तता करण्यासाठी प्रगत ऑपरेशन थिएटर, प्रत्यारोपण आयसीयू,तज्ज्ञांचा समावेश असलेली वैद्यकीय पथके आणि कठोर सुरक्षा प्रोटोकॉलने सुसज्ज आहे.

अवयव निकामी झालेल्या किंवा काही विशिष्ट गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी प्रत्यारोपण हा एकमेव जीवनरक्षक पर्याय ठरतो. जिवंत दात्याकडून आणि मृत दात्याकडून होणारे दोन्ही प्रकारचे प्रत्यारोपण जीव वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जिवंत दात्याकडून होणाऱ्या प्रत्यारोपणामुळे शस्त्रक्रियेसाठी संधी मिळते. वेळीच प्रत्यारोपण सेवा मिळाल्याने जगण्याची दर वाढतो, रुग्णाचे आरोग्य सुधारते आणि एकूणच जीवनाचा दर्जा सुधारतो. रुग्णांना प्रत्यारोपण उपचारांसाठी आता लांबचा प्रवास करावा लागणार नाही आणि त्यांना जवळच सुरक्षित आणि सर्वसमावेशक प्रत्यारोपण सेवा उपलब्ध होतील,असे न्युईरा हॉस्पिटल्सचे संचालक आणि मेंदू व मणक्याचे सर्जन डॉ. सुनील कुट्टी यांनी स्पष्ट केले.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हेंनी जागविल्या आठवणी

## "राष्ट्रीयत्व म्हणजे हिंदुत्व" अशी त्यांची व्याख्या आजही मार्गदर्शक

**दैनिक युवक आधार**


**पुणे / प्रतिनिधी :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या (शंभराव्या जयंतीच्या) पार्श्वभूमीवर विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मी.बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनानुसार केलेल्या कामाबद्दलच्या अनेक आठवणी जागवल्या आणि त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "१९५० ते १९६० या काळात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून आपले विचार मांडले. नंतर १९६० मध्ये 'मार्मिक' सुरू केले आणि १९६६ मध्ये शिवसेनेचा जन्म झाला. 'मार्मिक'मधील 'वाचा' आणि 'थंड बसा' या सदरांतून मराठी माणसांशी इतर कसे वागतात, याची दखल घेतली जायची. शालेय जीवनातच मी हे अनुभवले, त्यामुळे बाळासाहेबांबद्दल प्रेम आणि जिव्हाळा निर्माण झाला."

त्यांनी पुढे सांगितले, "१९९०-९२ च्या मुंबई दंगलीदरम्यान द्विध्रुवीकरण झाले. एका बाजूला काँग्रेस तर दुसऱ्या बाजूला भाजप-एनडीए. जॉर्ज फर्नांडिसांसारखे विविध विचारसरणीचे नेतेही एनडीएबरोबर गेले. त्यामुळे माझ्या मनात महाराष्ट्र आणि देशाचा विचार करणाऱ्या नेत्यांच्या बाजूने जावे का, असा विचार आला होता."

बाळासाहेबांच्या हिंदुत्वाविषयी बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "राष्ट्रीयत्व म्हणजे हिंदुत्व. तुम्ही कुठल्याही धर्माचे असाल, तरी राष्ट्रहिताला प्रथम मानत असाल तर तुम्ही हिंदू आहात, अशी बाळासाहेबांची व्याख्या होती. त्यांनी कधीच जात-धर्म बघून उमेदवारी दिली नाही."

महिला धोरणावर काम करण्याबाबत बाळासाहेबांनी दिलेल्या प्रोत्साहनाची आठवण सांगताना त्या म्हणाल्या, "महिला धोरणावर काम करताना काही अडचण येणार नाही, बिनधास्त करा, असे बाळासाहेब म्हणाले होते. त्यामुळे १९९८ मध्ये उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांची भेट घालून दिली आणि मी शिवसेनेत प्रवेश केला."



त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाची माहिती देताना सांगितले, "पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख, २००२ मध्ये विधान परिषद आमदार, २००५ मध्ये उपनेता, २००७ मध्ये प्रवक्ता, २००८ ते १०१२ पुणे जिल्हा संपर्क प्रमुख , २०१४ मध्ये विशेष हक्क समिती प्रमुख, लोकसभा, विधानसभा, मनपा निवडणूक यात स्टार प्रचारक म्हणुन १५ वेळा संधी, २०१९ मध्ये चौथ्यांदा आमदारकी आणि विधानपरिषद उपसभापतीपदी नियुक्ती झाली" अशा प्रकारे शिवसेनेची दीर्घकाळ सेवा करण्याची संधी मिळाली असल्याचे त्यांनी नमूद केले.

२०१२ मध्ये बाळासाहेबांच्या निधनाबाबत त्या भावुक झाल्या, "तो दिवस अतिशय दुःखद आणि कडेलोट व्हावा असा होता. बाळासाहेब आजारी असतानाही बातम्यांवर लक्ष ठेवून असत आणि आम्हा सर्वांना मार्गदर्शन करत. बाळासाहेबांच्या राज्यभरातील सभांना उपस्थित राहण्याची संधी मिळाली, प्रत्यक्ष स्टेजवर उपस्थित राहून त्यांना ऐकणे म्हणजे एक रोमांचकारी अनुभव होता."

बाळासाहेबांनी महिलांच्या सुरक्षेसाठी लढण्याची प्रेरणा दिल्याचे सांगताना त्या म्हणाल्या, "टीका झाली तरी भीती वाटली नाही, कारण शिवसेना आणि तिचे विचार हे आमचे कवचकुंडल आहेत." त्यामुळे कायमच निर्भीड राहत आलो आहे.

१९९५-९९ मधील युती सरकारवर बाळासाहेबांचे बारीक लक्ष असायचे, चुका झाल्या तर फटकारे यायचे. २०१४ नंतर भाजप-सेनायुती तुटली, त्यानंतरन काही काळाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने राज्यात सत्ता स्थापन केली, शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा यशाचा आलेख कायमच चढता राहिला आहे. विधानसभा, नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकांमध्ये शिवसेनेची सदस्यसंख्या वाढली आहे, असेही डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांनी आजही आम्हा सर्वांना मार्गदर्शन होत असल्याचे सांगताना त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची जोरदार कामगिरी सुरू असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

---

## पनवेलमध्ये शेकापला मोठा धक्का; दुंदरे येथील उसाटकर कुटुंबीयांचा समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. दुंदरे येथील गुरुनाथ रामदास उसाटकर, बारक्या नामदेव उसाटकर, विनायक रामदास उसाटकर, आशीर्वाद गुरुनाथ उसाटकर तसेच सिद्धेश तुळशीराम उसाटकर यांनी त्यांच्या अनेक समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

हा प्रवेश सोहळा कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे भारतीय जनता पार्टीत स्वागत करत संघटन वाढीसाठी आणि विकासाच्या राजकारणासाठी एकत्र काम करण्याचे



आवाहन केले. याप्रसंगी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी नगरसेविका निता माळी, माजी सरपंच रमेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य शांताराम चौधरी, नाना पाटील, संदीप पाटील, राजेश चौधरी, संतोष चौधरी, कृष्णा सिनारे, रुपेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

एकेकाळी पनवेल तालुक्यात भक्कम संघटन असलेल्या शेतकरी कामगार पक्षाने काँग्रेस व शिवसेना (महाविकास आघाडी) यांच्या सोबत आघाडी केल्याने पक्षाची स्वतंत्र ओळख धूसर झाली आहे. स्वतःच्या ताकदीवर राजकारण करण्याऐवजी इतर पक्षांच्या कुबड्यांवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे शेकापमधील अनेक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व अस्वस्थता वाढली आहे. याच कारणामुळे शेकापला सातत्याने गळतीचा सामना करावा लागत आहे. दुंदरे येथील उसाटकर कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने शेकापला मोठा दणका बसला आहे.

---

## इंदापूर तालुक्यातील नेत्यांची युती, कार्यकर्त्यांची कोंडी; प्रामाणिक कार्यकर्त्यांचा स्वाभिमान दुखावला

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे आणि माजी आमदार व राज्यमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यातील राजकीय वैर अनेक वर्षे टोकाचे राहिले.

मात्र, गेल्या काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गट आणि शरदचंद्र पवार गटाची अघटीत युती झाल्याने या दोन्ही नेत्यांचेही राजकीय ‘मिलन’ घडून आले आहे.

नेत्यांची ही युती वरवर जरी राजकीय गणिते साधणारी वाटत असली, तरी तिचा फटका थेट तळागाळातील कार्यकर्त्यांना बसताना दिसत आहे. आपल्या-आपल्या गावांमध्ये वर्षानुवर्षे पक्ष वाढीसाठी झटणारे, निवडणुकीच्या काळात आघाडीवर राहणारे प्रामाणिक व स्वाभिमानी कार्यकर्ते आज मात्र नाचक्कीला सामोरे जात आहेत.

तिकीट वाटपात पक्षासाठी सातत्याने काम करणाऱ्या खऱ्या हक्कदार कार्यकर्त्यांना डावलून, नव्याने आलेल्या किंवा राजकीय समीकरणात बसणाऱ्या व्यक्तींना संधी दिल्याने मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली आहे.

“नेते एकत्र आले, पण आमची विचारणा कुणीच केली नाही,” अशी भावना अनेक कार्यकर्त्यांमध्ये उमटत आहे.

या घडामोडींमुळे अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांचा उत्साह मावळला असून, काही ठिकाणी तर अंतर्गत अस्वस्थता उघडपणे दिसून येत आहे.

नेत्यांची युती टिकेल की नाही, यापेक्षा या युतीत कार्यकर्त्यांचा स्वाभिमान आणि विश्वास टिकतो का, हा खरा प्रश्न आता इंदापूरच्या राजकारणात केंद्रस्थानी आला आहे.

> “आम्ही वर्षानुवर्षे पक्षासाठी गावोगावी राबलो,संघर्ष केला,विरोधकांशी दोन हात केले. आज नेते एकत्र आले हे मान्य,पण त्या युतीत आमच्या स्वाभिमानाला मात्र जागा राहिली नाही.तिकीट वाटपात खऱ्या कार्यकर्त्यांना डावलून बाहेरच्यांना संधी दिली गेली, त्यामुळे गावात आमचीच नाचक्की झाली.असा अन्याय झाला तर कार्यकर्त्यांनी पुढे काय भूमिका घ्यावी,हाच मोठा प्रश्न आहे.”असा नाव न छापन्याच्या अटीवर सणसर येथील कार्यकर्त्यांनी भूमिका मांडली आहे

---

## गटविकास अधिकारी श्री विवेक गुंड साहेब यांच्या हस्ते अभिनेता प्रमोद पंडित यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**लोणी / प्रतिनिधी :** अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडित यांनी दिव्यांगात्वावर मात करत आपली अभिनेता म्हणून एक नवी ओळख निर्माण केली तसेच सध्या लोकप्रिय असलेले गाणे झटपट पटापट या गाण्याची लोकप्रियता लहानापासून मोठ्यापर्यंत महाराष्ट्रभर क्रेझ वाढत आहे तसेच,द फार्म हाऊस हा मराठी चित्रपट ऑल महाराष्ट्र प्रदर्शित होत आहे या चित्रपटामुळे सर्वत्र त्यांच्या चाहता प्रेक्षकाची वाढ होत आहे

पंचायत समिती राहता च्या वतीने श्री विवेक गुंड साहेब ( गटविकास अधिकारी ) यांच्या शुभहस्ते अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडित यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला यावेळी श्री प्रसाद खंडागळे साहेब ( पंचायत समिती राहता-( पेन्शन विभाग ),श्री जालिंदर वाकचौरे साहेब ( पंचायत समिती राहता -( समाज कल्याण विभाग ),श्री रविंद्र नालकर साहेब ( पंचायत समिती राहता -( प्रशासन विभाग ), ज्ञानेश्वर साबळे ( पत्रकार ) यांच्या उपस्थितीत या सर्व मान्यवरांनी त्यांच्या अभिनयाचे व



कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या

---

## नेहरू युवा केंद्र यवतमाळ यांच्या अंतर्गत उमरखेड तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

### युवकांनी मैदानी खेळाला महत्व द्यावे - ठाणेदार निलेश शेंबडे

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी/ राजु गायकवाड (मोहदरी) :** नेहरू युवा केंद्र यवतमाळ यांच्या वतीने धनज येथील आश्रमशाळेच्या मैदानावर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.नेहरू युवा केंद्र नेहमीच युवकांच्या विकासाचे विविध कार्यक्रम राबवित असतात. त्यादृष्टीने युवक हे मोबाइलच्या दुनियेतून बाहेर यावे त्यांनी मैदानी खेळ खेळावे शारीरिक विकास व्हावा, युवकांनी समोर आपले भविष्य खेळात घडवावे आणि आपले आरोग्य सुदृढ ठेवावे हा उद्देश ठेवून या खेळाचे नियोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत गोळाफेक,लांबउडी, कब्बडी, खो-खो आणि १०० मीटर रनिंग असे नियोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा वयोगट १८ ते



२९ या युवकांसाठी होत्या. कबड्डी स्पर्धेत ZP धनज या टीमने प्रथम क्रमांक मिळविला तर द्वितीय क्रमांक धनज आश्रम शाळा येथील युवकांनी मिळवला. तिसरा क्रमांक हा मोहदरी येथील चमूने पटकावला आहे. सर्व विजेत्या स्पर्धकांना नेहरू युवा केंद्र यवतमाळ तालुकास्तरीय ट्रॉफी, प्रमाणपत्र मेडल देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी ठाणेदार निलेश शेंबडे यांनी युवकांना मार्गदर्शन केले त्यांनी मैदानी खेळावर भर दिला पाहिजे नियमित व्यायाम केला पाहिजे अशी माहिती दिली.या कार्यक्रमाचे उद्घाटक प्राथमिक आरोग्य केंद्र मुळावा चे आरोग्य अधिकारी डॉ. विशाल दवने होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पोफाळी चे ठाणेदार निलेश शेंबडे व त्यांची टीम,धनज येथील सरपंच वनितााताई पाचपुते,धनज येथील माजी सरपंच चरण डोंगरे,पोलीस पाटील धनवे, पत्रकार गजानन पवार, शाळेचे मुख्याध्यापक विनोद भाकरे सह त्यांचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन नेहरू युवा केंद्राचे राजू गायकवाड व पियुष भारती यांनी केले होते.सदर कार्यक्रम हा नेहरू युवा केंद्राचे जिल्हाधिकारी सारंग मेश्राम व अनिल डेंगे यांच्या मार्गदर्शनात पार पडला आहे.

> तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी मला उदघाटक म्हणून बोलावलं आयोजकांचे आभार मानतो.मैदानी खेळ हा आरोग्याचा अविभाज्य घटक असून या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या आरोग्य सोबतच सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो त्यामुळे हा उपक्रम प्रशंसाजनक आहे.या सोबतच शासनाचे अरुणोदय सिकल सेल विशेष मोहीम सुरू असून ० ते ४० वर्षे वयोगटातील सर्वांनी आपली सिकल सेल तपासणी करून घेण्याचे मी आवाहन करतो.
> डॉ.विशाल मल्हारी दवणे वैद्यकीय अधिकारी ( गट अ )प्राथमिक आरोग्य केंद्र मुळावा

---

## गव्हाण जिल्हा परिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपाली रितेश गायकवाड यांचा उमेदवारी फॉर्म भरला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दिनांक -21 जानेवारी रोजी पनवेल तहसीलदार ठिकाणी गव्हाण जिल्हा परिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी चे अधिकृत उमेदवार सौ.दीपाली रतिश गायकवाड यांनी फॉर्म भरला असून रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्या अंतर्गत



वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून प्रथमच फॉर्म भरण्यात आले. सदर फॉर्म भरताना पनवेल तालुका अध्यक्ष ऍड हेमंत शिंदे व महासचिव अक्षय उबाळे तसेच उलवे गावचे शाखा अध्यक्ष रतिश गायकवाड सह तालुक्यातील पदाधिकारी व स्थानिक रहिवाशी मोठया संख्येने उपस्थित होते

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट तर्फे माहिती देण्यास टाळाटाळ

### तक्रारकर्ते यांचे दि. २३ जानेवारी रोजी कार्यालयासमोर अमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/माधव काईतवाड बोरगडीकर**

**नांदेड :** जिल्ह्यातील किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय येथे गेल्या अनेक दिवसांपासून कार्यालयातर्फे दिल्या जाणारा निधी व लाभार्थ्यांची यादी मिळावी यासाठी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज करूनही माहिती न मिळाल्याने तक्रारकर्ते सोनबा वानोळे यांनी दिनांक २३ जानेवारी रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत अनेक योजना राबविल्या जातात व लाभार्थ्यांना योजना, सोयी सुविधा पुरविल्या जातात. तसेच या कार्यालय अंतर्गत विविध योजनांसाठी आदिवासी बांधवांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी निधी दिला जातो. आदिवासी आश्रम शाळा असो की इतर कोणतेही कामे असो यासाठी या कार्यालय अंतर्गत निधी दिला जातो. परंतु माहिती अधिकारा अंतर्गत या कार्यालयात या योजनांचा आलेला निधी व कोणकोणत्या लाभार्थ्यांना लाभ दिला यांची यादी याबाबत माहिती मागितली असता निवेदनकर्त्यांना कुठलीही माहिती कार्यालय पुरवत नाही. वारंवार पत्रव्यवहार करूनही माहिती न मिळाल्यामुळे त्रस्त झालेले माहिती अधिकार कार्यकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते सोनबा वानोळे यांनी दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी कार्यालयासमोर आमरण उपोषण करत असल्याचे निवेदन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट येथे दिले आहे.

**कार्यालयाकडून माहिती अधिकार अर्जास केराची टोपली**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट मध्ये अनेक निवेदनकर्त्यांनी माहिती अधिकार अंतर्गत माहिती मागवली असता कोणतीही माहिती कार्यालय पुरवत नाही. अक्षरशः माहिती अधिकार अर्जास केराची टोपली दाखवली जात आहे.यामुळे माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत ही माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही होईल का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या बाबीकडे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे वरिष्ठ अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी लक्ष देऊन माहिती अधिकार कार्यकर्त्यांना न्याय मिळवून द्यावा ही मागणी जोर धरत आहे.

# लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा महोत्सवाची उत्साहात सुरुवात

### मैदानी खेळामुळे मुलांचा शारीरिक, मानसिक, भावनिक विकास होतो - पो.नि.शैलेश पवार

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथील लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल मध्ये शालेय क्रीडा महोत्सवाची उत्साहात सुरुवात करण्यात आली. या उद्घाटन प्रसंगी पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शैलेश पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच या क्रीडा महोत्सवाची सुरुवात आणि उद्घाटन भामेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक हरी भगत सर, आणि क्रीडा विभाग प्रमुख सुभाष शेवाळे सर तसेच लिटल फ्लावर इंग्लिश स्कूलचे प्राचार्य नजीर पठाण सर, प्राथमिकच्या प्राचार्य सीमा माळी मॅडम, ज्येष्ठ पत्रकार विजय जाधव




यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या क्रीडा महोत्सवाचे सूत्रसंचालन शाळेच्या विज्ञान विभागाच्या मॅडम वसुंधरा यांनी उत्कृष्टपणे केले. उज्वला मॅडम यांनी जिंकलेल्या मुलांना गोल्ड, सिल्वर, आणि ब्राँझ मेडल्स देऊन गौरव केला. या वेळी क्रीडा महोत्सवाचे संपूर्ण कार्यभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक शाहिद सर, अर्जुन सानप सर, भाऊसाहेब सावंत सर, कांतिलाल घोलप सर यांनी उत्कृष्टपणे केले. या प्रसंगी बोलताना पोलिस निरीक्षक पवार साहेब, हरिभगत सर, सुभाष शेवाळे सर यांनी मुलांना मोबाईल चे गेम ना खेळता मैदानी गेम्स खेळा आणि आपला शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकास वाढवा असा मोलाचा संदेश पालकांना, विद्यार्थ्यांना आणि सर्व शिक्षकांना दिला. या वेळी महिला पालकांनी देखील या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून बक्षिसे मिळवली. या क्रीडा महोत्सव मध्ये छोट्या छोट्या मुलांचे मैदानी खेळ तसेच विविध सांघिक खेळ होणार आहेत. छोट्या छोट्या मुलांनी क्रीडा प्रकारामध्ये आपापले कौशल्य दाखवून गोल्ड मेडल सिल्वर मेडल आणि ब्रांच मेडल पदके मिळवली छोट्या मुलांचा उत्साह क्रीडा महोत्सवामध्ये ओसंडून वाहत होता. या वेळी शाळेचे भरपूर प्रमाणात पालक, माता पालक उपस्थित होते. सर्वांनी क्रीडा महोत्सवाचे खूप कौतुक केले. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना नेहमी तंदुरुस्त आणि निरोगी शरीर ठेवण्यासाठी दररोज व्यायाम केला पाहिजे आणि मैदानी खेळ खेळले पाहिजे असे मार्गदर्शन केले. तसेच या वेळी शाळेचे प्राचार्य पठाण सर यांनी सर्व मान्यवर पाहुण्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे सुरुवात देशभक्ती गीत या वर उत्कृष्ट नृत्य सादर करून करण्यात आली आणि शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे लेझीम नृत्य सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. या वेळी विविध खेळाचे प्रकार घेण्यात आले. हा क्रीडा महोत्सव आणखी दोन दिवस चालणार आहे. असे संयोजन समिती ने सांगितले आहे.

## सी के टी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी भरत चौधरी यांची अमेरिकेतील न्यू जर्सी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, न्यूयॉर्क या नामांकित संशोधन संस्थेत निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कु. भरत स्वरूपम चौधरी यांची न्यू जर्सी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, न्यूयॉर्क (अमेरिका) येथे पोस्ट डॉक्टरल रिसर्च असोसिएट (संशोधन सहाय्यक) म्हणून निवड झाली आहे. ते येत्या १ फेब्रुवारीपासून आपल्या नवीन पदावर रुजू होणार आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल कु. भरत स्वरूपम चौधरी यांचा आज महाविद्यालयात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी.




गडदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कु. भरत चौधरी यांनी चांगू काना ठाकूर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातून बी.एस्सी. पदवी प्राप्त केली असून मुंबई विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला होता. त्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातून ऑरगॅनिक केमिस्ट्री या विषयात एम.एस्सी. पूर्ण करत नेट-जेआरएफ ही राष्ट्रीय पात्रता (AIR-42) सन्माननीय यश मिळवत प्राप्त केली. भरत चौधरी यांना एम.एस्सी. त्यांच्या शिक्षणासाठी आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संपूर्ण आर्थिक सहाय्य केले होते.

पुढे त्यांनी २०१९ ते २०२५ या कालावधीत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IIS-ER), पुणे येथे आपले पीएच.डी चे शिक्षण पूर्ण केले.

'स्टिम्युली रिस्पॉन्सिव्ह लैक्टोनायझेशन बेस पर्सल्फाइड जनरेटर हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. 'लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांचे पाठबळ आणि सीकेटी महाविद्यालयातील अध्यापक वर्गाचे मार्गदर्शन लाभल्यामुळेच आपल्याला शैक्षणिक क्षेत्रात अशी उत्तुंग भरारी घेता आली.

असे नमूद करत भरत चौधरी यांनी रामशेठ ठाकूर साहेबांचे तसेच महाविद्यालय व्यवस्थापनाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. संशोधन क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या भरत चौधरी यांच्या या आंतरराष्ट्रीय यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला आणखी एक गौरवशाली पान लाभले आहे.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव वाडी नागपूर :** जिल्हा ग्रंथालय कार्यालयाच्या वतीने दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. या पंधरवड्याच्या निमित्ताने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नागपूर येथे मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.या पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विदयापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शालिनी लिहीतकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालय लोकाभिमुख होऊन मराठी भाषेतील ग्रंथांचा उपयोग वाढविण्याकरीता नवनवीन उपक्रम राबविण्याविषयीची माहिती दिली. तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या नागपूर येथील प्रतिथयश लेखिका प्रा. मनीषा साधू यांनी मराठी भाषेची ऐतिहासिक पाश्र्वभूमी, मराठी भाषेचा विकास व मराठी भाषेच्या सहाय्याने रोजगाराच्या संधी याबाबत माहिती दिली. ग्रंथालयातील ग्रंथ जितक्या जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचतील तितका मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होईल, तसेच ग्रंथोत्सवाऐवजी नियमित वाचन करणा-या रसिक वाचकांकरीता वाचकोत्सोव साजरा करण्यात यावा, अशीही त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तांत्रिक सहाय्यक माला राठोड यांनी केले. तर सूत्रसंचालन कोमल गेडाम यांनी केले. आभार सूर्यकांत भोसले यांनी मानले.

# महापालिका महापौर आरक्षण जाहीर

### महिला नेतृत्वाला संधी, राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यातील विविध महापालिकांसाठी महापौर पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले असून, या आरक्षणात अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय तसेच खुल्या प्रवर्गाचा समावेश आहे. विशेष म्हणजे यावेळी मोठ्या प्रमाणावर महिला आरक्षण लागू झाल्याने आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकारणात नव्या हालचालींना वेग आला आहे.

आरक्षणानुसार कल्याण-डोंबिवली महापालिका अनुसूचित जमातीसाठी, तर ठाणे महापालिका अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. लातूर व जालना महापालिकांमध्ये अनुसूचित जाती महिला, तर पनवेल, इचलकरंजी, उल्हासनगर आणि कोल्हापूर येथे ओबीसी प्रवर्ग लागू करण्यात आला आहे.

अकोला, अहिल्यानगर, चंद्रपूर आणि जळगाव या महापालिकांमध्ये ओबीसी महिला आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

राज्यातील प्रमुख महापालिकांमध्ये खुला महिला प्रवर्ग लागू झाला असून, यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, धुळे, अमरावती, मालेगाव, मीरा-भाईंदर, नागपूर, नांदेड-वाघाळा, नाशिक आणि नवी मुंबई यांचा समावेश आहे.

तर भिवंडी-निजामपूर, पिंपरी-चिंचवड, परभणी, सांगली-मिरज, वसई-विरार आणि सोलापूर या महापालिकांसाठी खुला प्रवर्ग ठेवण्यात आला आहे.

महिला आरक्षणामुळे अनेक महापालिकांमध्ये इच्छुक पुरुष नेत्यांना पावले मागे घ्यावी लागण्याची शक्यता असून, पक्षांतर्गत नव्या नेतृत्वाचा शोध सुरू झाला आहे. विशेषतः मुंबई, पुणे, नागपूर, नवी मुंबई यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये महिला उमेदवारांच्या नावांवर जोरदार चर्चा सुरू आहे.

महापौर आरक्षणामुळे आगामी महापालिका निवडणुकांमध्ये सत्ता-समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त होत असून, स्थानिक राजकारणात हालचालींना वेग आला आहे.

## प्रजासत्ताक दिनी प्लास्टिक ध्वज विक्री व वापरास मनाई

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** २६ जानेवारी या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिनी लहान आकारातील कागदी व प्लास्टिक राष्ट्रध्वजांची विक्री मोठया प्रमाणात केली जाते. शालेय विद्यार्थी व लहान मुले यांच्यासह अनेक व्यक्ती राष्ट्रभक्ती व उत्साहापोटी राष्ट्रध्वज विकत घेतात व त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी इतरत्र टाकून देतात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. काहीवेळा तसेच विशेष कला व क्रीडा प्रसंगी वैयक्तिकरित्या वापरण्यात येणारे राष्ट्रध्वज फेकले



जातात. रस्त्यात विखुरलेले राष्ट्रध्वज जर प्लास्टिकचे असतील तर प्लास्टिक बरेच दिवस नष्ट होत नाही. त्यामुळे बरेच दिवस त्याच ठिकाणी पडून असतात.

राष्ट्रहिताचे दृष्टीने ही गंभीर बाब आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही, त्याअनुषंगाने प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाची विक्री व वापर कोणही करु नये राष्ट्रध्वजाचा आदर करणे हे देशाच्या प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे व त्याची विटंबना करणे दंडनीय अपराध आहे. वापरास उपयुक्त नसलेले, फाटलेले व जीर्ण झालेले किंवा माती लागलेले, रस्त्यावर किंवा मैदानात पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन ते तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयात निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेस सुपूर्द करावे. त्यासाठी शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था व सर्व यंत्रणेमार्फत ही बाब विद्यार्थी व नागरीकांच्या निदर्शनास आणून देण्याकरीता सर्वांनी सहकार्य करावे.

असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## म्हणून भरत गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा अभिमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार; सामंजस्य करारानंतर वर्षभरात उद्योग उभारणीचे दावोस येथे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी**

**नागपूर :** "जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) गेल्या वर्षी करण्यात आलेल्या ५०० कोटी रुपयांच्या सामंजस्य कराराची 'ॲथल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे उद्योजक भरत गीते यांनी अवघ्या एका वर्षात यशस्वी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष उत्पादन सुरू केले आहे. वर्षभरात उद्योग उभारणी करणाऱ्या गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा मला अभिमान वाटतो," असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

दावोस येथे सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत देवेंद्र फडणवीस आणि भरत गीते यांच्यातील संवादावेळी




ते बोलत होते. या भेटीदरम्यान उद्योग उभारणीतील नियोजन, वेगवान अंमलबजावणी, प्रशासन आणि उद्योजकांमधील समन्वय तसेच उत्पादन क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील वाढते महत्त्व यावर सविस्तर चर्चा झाली. 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' आणि 'व्होकल फॉर लोकल' या केंद्र सरकारच्या उपक्रमांना बळ देणाऱ्या या उपक्रमांतून कमी कालावधीत उद्योग उभारणी शक्य असल्याचा प्रेरणादायी संदेश देशभरातील उद्योजकांना मिळाला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी येथे उभारण्यात आलेल्या 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक ॲल्युमिनियम कास्टिंग्ज उत्पादन प्रकल्पाने अल्पावधीतच उत्पादन सुरू करत राज्यासमोर आदर्श औद्योगिक मॉडेल उभे केले आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून, स्थानिक औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळाली आहे."

"सामंजस्य करार कागदापुरता न राहता एका वर्षात प्रत्यक्ष उत्पादनात रूपांतरित होऊ शकतो, याचे भरत गीते आणि तौरल इंडिया हे उत्तम उदाहरण आहे. मराठी उद्योजकांमध्ये जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता आहे. त्यांना योग्य धोरणात्मक पाठबळ दिल्यास महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात नवे शिखर गाठेल," असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

भरत गीते म्हणाले, "तौरल इंडियाने २०१६ पासून औद्योगिक विस्तार करत ऊर्जा क्षेत्र, संरक्षण उत्पादन, आरोग्य उपकरणे तसेच एरोस्पेस क्षेत्रासाठी आवश्यक अचूक ॲल्युमिनियम कास्टिंग्ज निर्मितीत भरीव योगदान दिले आहे. विविध क्षेत्रांतील या योगदानामुळे राज्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळत असून, आर्थिक वाढीस हातभार लागत आहे.

"उत्पादन क्षेत्र हे मजबूत अर्थव्यवस्थेचा कणा असून, वाहन उद्योग, अभियांत्रिकी, पायाभूत सुविधा, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक मोबिलिटी, संरक्षणपूरक उद्योग, कृषी प्रक्रिया आणि उच्च-मूल्य निर्यातक्षम उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्यास राज्याचा औद्योगिक पाया अधिक भक्कम होईल," असा विश्वास गीते यांनी व्यक्त केला.

## सावधान ! तो बिबट्याच ! ठसे ओळखले, ट्रॅप कॅमेरे देखील बसवले !

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** तालुक्यातील रूपुर शिवारात कोळवाडीच्या महिलेवर बिबट्याने जिवघेणी झडप मारली होती, दैव बलवत्तर म्हणून ती महिला जखमी झाली पण बचावली. तातडीने गुरूवारी त्या स्थळी ट्रॅप कॅमेरा बसवून बिबट्याच्या हालचालीवर लक्ष ठेवले जाणार आहे. ठसे बिबट्याचेच असल्याचा निर्वाळा देऊन नागरिकांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला .

बुधवारी कोळवाडीची महिला मणकर्णा नेटके ही आपल्या शेतात गेली असता तिच्यावर बिबट्याने झडप घातली होती. स्कार्प गळ्याभोवती असल्याने ती बचावली. आज गुरूवारी वनविभाग व वन्यजीव अभ्यासक तथा मानद वन्यजीव रक्षक सिध्दार्थ सोनवने यांनी संयुक्तपणे पहाणी करून ठसे बिबट्याचे असल्याचे सांगितले. याठिकाणी आता ट्रॅप कॅमेरा बसवला असुन बिबट्याचा संचार कैद होणार आहे. त्याअनुषंगाने वनविभाग पुढील कारवाई करेल असे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल घोडके व वनपाल अजय देवगुडे यांनी सांगितले.

**कॅमेरात नको पिंजऱ्यात हवा**

कॅमेरे बसवल्यामुळे बिबट्या फक्त कॅमेऱ्यात आणि फोटोमध्ये कैद होणार आहे. शेतकरी वर्गात मात्र बिबट्या कॅमेरात नको तर पिंजऱ्यात कैद करायला हवा.

अशी चर्चा होत आहे.



# सेवेचा दीपस्तंभ : मुख्याध्यापक रामहरी मारुती ठोंबरे यांचा सेवा-पूर्ती सोहळा

**दैनिक युवक आधार**

**आष्टी (जि. बीड) :** शिक्षण क्षेत्रात २९ वर्षे अखंड सेवा बजावत, हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पेरणारे आणि गावागावातील शाळांना प्रगतीच्या शिखरावर नेणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आनंदवाडी, केंद्र दौलवडगाव, ता. आष्टी येथील मुख्याध्यापक श्री. रामहरी मारुती ठोंबरे यांचा सेवा-पूर्ती कार्यक्रम सोहळा अत्यंत सन्मानपूर्वक व उत्साहात संपन्न होत आहे.

रामहरी ठोंबरे यांचा जन्म २६ जानेवारी १९६८ रोजी देऊळगाव घाट येथे झाला. त्यांचे वडील मारुती व आईचे नाव रंभाबाई होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देऊळगाव घाट येथे झाले लहानपणापासूनच शाळेमध्ये ठोंबरे सर हुशार होते.पुढील. शिक्षणासाठी त्यांना तिसगाव येथे मामाकडे जावे लागले. लक्ष्मण भापसे व रघुनाथ भापसे यांनी त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली आणि मायेच्या छायेत त्यांनी नववीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांनी अहमदनगर येथील नगर कॉलेज येथे बारावी ते पदवीचे द्वितीय वर्ष पर्यंतचे शिक्षण घेतले. शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी वैजापूर येथे डी.एड.चे दोन वर्षांचे शिक्षण पूर्ण केले आणि शिक्षकी पेशामध्ये प्रवेश केला.

दि. २६ नोव्हेंबर १९९६ रोजी त्यांना तालुका आष्टीतील बांदखेल येथे प्राथमिक शिक्षक म्हणून प्रथम नेमणूक मिळाली. बांदखेल येथे त्यांनी तब्बल १६ वर्षे मनापासून सेवा बजावत विद्यार्थ्यांचा पाया मजबूत केला. त्यानंतर काकडवाडी (३ वर्षे), लमानतांडा (३ वर्षे) आणि आनंदवाडी (७ वर्षे) अशा विविध ठिकाणी त्यांनी शिक्षक म्हणून कार्य केले. त्यांच्या एकूण सेवाकाळाची नोंद २९ वर्षांची असून त्यापैकी २५ वर्षे त्यांना मुख्याध्यापक पदावर कार्य करण्याची संधी लाभली.

विशेष म्हणजे बांदखेल येथे सेवा बजावत असताना तेथील शाळा केवळ इयत्ता चौथीपर्यंत होती. पण त्यांनी तन-मन-धनाने केलेल्या प्रयत्नांमुळे ती शाळा पुढे इयत्ता आठवीपर्यंत विकसित झाली. त्या



काळात शाळेसाठी पुरेशा खोल्या नव्हत्या. मात्र शासकीय योजना, लोकसहभाग याच्या माध्यमातून शाळेसाठी आवश्यक खोल्या उभारण्यामध्ये ठोंबरे सरांचा मोलाचा वाटा राहिला. शिक्षणाचा दर्जा वाढवतानाच शाळेची भौतिक प्रगती घडवून आणणारा हा आदर्श सेवक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.

वेळ प्रसंगी पदरमोड करून त्यांनी विद्यार्थ्यांसाठी योजना राबवल्या. त्यांनी तन-मन-धनाने विद्यार्थ्यांसाठी काम केले.

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी अनेक उपक्रम सातत्याने राबवले. सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक सहली, विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, शालेय उपक्रमांचे आयोजन अशा अनेक माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि गुणवत्ता निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. आधुनिक शिक्षणपद्धतीचा स्वीकार करून त्यांनी स्मार्ट पद्धतीचे अध्यापन व शिक्षक प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षक म्हणूनही काम केले. सेवा कालावधीत त्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून शिक्षणाच्या नव्या वाटा गावातील मुलांपर्यंत पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली.

फक्त शिक्षक म्हणूनच नव्हे तर समाजजागृतीचे कार्यकर्ते म्हणूनही त्यांनी योगदान दिले. व्यसनापासून दूर राहणे व व्यसनमुक्त समाज घडवणे या हेतूने त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये जनजागृती केली. आज त्यांच्या मार्गदर्शनातून घडलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत कार्यरत असून समाजात आदर्श नागरिक म्हणून नाव कमावत आहेत, हीच त्यांच्या सेवेला मिळालेली खरी पावती आहे.

कौटुंबिक जीवनातही त्यांनी कर्तव्याची आणि संस्कारांची शिकवण जपत आदर्श निर्माण केला. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असून मुलगा इंजिनियर आहे. मुलगी कुस्तीमध्ये राष्ट्रीय खेळाडू असून तिने पदक पटकावले आहे व सध्या पुणे येथे पोलीस खात्यात कार्यरत आहे.

रामहरी ठोंबरे यांचा सेवाकाळ म्हणजे शिक्षणाची साधना, विद्यार्थ्यांचा विकास आणि समाजासाठी काम यांचा आदर्श वस्तुपाठ आहे. त्यांच्या सेवा-पूर्ती सोहळ्यानिमित्त त्यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी व दीर्घायुष्य लाभो, अशी सर्व स्तरातून सदिच्छा व्यक्त होत आहे.

**— लेखन : महादेव आमले**
**मू.पो. अंभोरा ता.आष्टी जी बीड**

# तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादक :** दि. 22 तृतीयपंथीय हा समाजातील एक दुर्लक्षित घटक असुन, या घटकास समाजाकडुन सापत्न व भेदभावाची वागणुक दिली जाते. नेहमीच भेदभाव व सापत्न वागणुकीमुळे समाजातील हा घटक विकास प्रक्रियेपासुन दुर्लक्षित राहीलेला आहे. त्यामुळे या समाज घटकाचे शासनामार्फत मुलभुत अधिकाराचे संरक्षण करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे करिता तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९ व नियम २०२० संपुर्ण देशात लागु झालेला आहे. तृतीयपंथीयांच्या समस्या सोडविणे करिता त्यांची ओळख निश्चित करणे करिता केंद्र शासनाने नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर हे संकेतस्थळ उपलब्ध करुन दिले आहे.

तृतीयपंथीय समुदायातील व्यक्तींना आकस्मिक परिस्थितीत मदत मिळावी तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे या करिता नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर या पोर्टलवर नॅशनल हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन दिलेला आहे. तृतीयपंथीय समुदायातील व्यक्तींनी त्यांच्या तक्रारी व समस्यांच्या निराकरणासाठी तसेच आकस्मिक स्थितीत मदत मिळण्यासाठी तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधर वड्यानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** जिल्हा ग्रंथालय कार्यालयाच्या वतीने दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. या पंधरवड्याच्या निमित्ताने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नागपूर येथे मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विदयापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शालिनी



लिहीतकर यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले. ग्रंथालय लोकाभिमुख होऊन मराठी भाषेतील ग्रंथांचा उपयोग वाढविण्याकरीता नवनवीन उपक्रम राबविण्याविषयीची माहिती दिली. तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या नागपूर येथील प्रतिथयश लेखिका प्रा. मनीषा साधू यांनी मराठी भाषेची ऐतिहासिक पाश्र्वभूमी, मराठी भाषेचा विकास व मराठी भाषेच्या सहाय्याने रोजगाराच्या संधी याबाबत माहिती दिली. ग्रंथालयातील ग्रंथ जितक्या जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचतील तितका मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होईल, तसेच ग्रंथोत्सवाऐवजी नियमित वाचन करणा-या रसिक वाचकांकरीता वाचकोत्सोव साजरा करण्यात यावा, अशीही त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तांत्रिक सहाय्यक माला राठोड यांनी केले. तर सूत्रसंचालन कोमल गेडाम यांनी केले. आभार सूर्यकांत भोसले यांनी मानले.

# 11 व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात अक्षरोत्सव प्रदर्शन

## रिंगणे येथे 31 जानेवारी व 1 फेब्रुवारीला आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सिंधुदुर्ग प्रतिनिधी/ गुरुनाथ तिरपणकर :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळेरे येथील संदेश पत्र संग्राहक निकेत पावसकर यांच्या अक्षरोत्सव या आगळ्यावेगळ्या संग्रहाचे प्रदर्शन रिंगणे येथे होणाऱ्या 11 व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात आयोजित केले आहे. हे प्रदर्शन 31 जानेवारी व 1 फेब्रुवारी असे दोन दिवस वाचकांना पहायला मिळणार आहे. राजापूर लांजा तालुका नागरिक संघ, मुंबई दरवर्षी हे साहित्य संमेलन आयोजित करते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन उद्योजक विश्वास चव्हाण यांच्या हस्ते 31 जानेवारीला सकाळी 10 वाजता करण्यात येईल. तर या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर असून संमेलन उद्घाटक लालबाग राजा सचिव सुधीर साळवी असून यावेळी आमदार किरण सामंत, लांजा नगराध्यक्ष सावली कुरूप, कोकण मिडियाचे संपादक प्रमोद कोनकर, लेखिका डॉ. विजयालक्ष्मी देवगोजी, शाहू फुले आंबेडकर विचारवंत नामदेव खामकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**यापूर्वी अनेक ठिकाणी प्रदर्शने**

यापूर्वी बेळगाव, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, चिपळूण आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध माध्यमिक शाळा, वाचनालये आणि इतर कार्यक्रमानिमित्त मिळून 25 प्रदर्शने झाली असून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी विविध मान्यवरांनी या संग्रहाचे कौतुक केले असून विविध ठिकाणी नामवंत व्यक्तींनी प्रदर्शनाला भेटही दिलेली आहे. याशिवाय या अनोख्या संग्रहाबद्दल निकेत पावसकर यांची सह्याद्री वाहिनीसह सिंधुदुर्ग आकाशवाणी केंद्र यावर मुलाखतही प्रसारित झाली आहे.

निकेत पावसकर हे पत्रकार असून कासार्डे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,



कासार्डे येथे कार्यरत आहेत. त्यांनी गेल्या 20 वर्षात विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या हस्ताक्षरातील संदेश पत्रांचा संग्रह करत आहेत. त्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुमारे 2 हजार मान्यवर व्यक्तींची संदेश पत्रे भारतीय पोस्ट कार्डवर घेतलेली आहेत. या संमेलनाच्या निमित्ताने साहित्य, शैक्षणिक, सामाजिक, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या हस्ताक्षरातील संदेश पत्रांचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहे. दोन दिवस चालणारे हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत असून विशेषत: शालेय मुलांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन निकेत पावसकर यांनी केले आहे.

**या परदेशी व्यक्तींची पत्रे संग्रहात**

निकेतच्या या संग्रहामध्ये जागतिक किर्तिचा खेळाडू, टेनिसच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळाडू रॉजर फेडरर (स्वित्झर्लंड), मुहम्मद युनुस (बांग्लादेश), आयर्लंड देशाचे पंतप्रधान-सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सुपुत्र डॉ. लिओ वराडकर, युरोपियन सेन्ट्रल बँकेचे चेअरमन मारिओ ड्राघी (जर्मनी), हॉलीवूड निर्माता अभिनेता दिग्दर्शक सर मायकेल केन (लंडन), अभिनेता जॅकी चेन, अमेरिकन मॉडेल आणि अभिनेत्री कॅरोल अल्ट, मॉडेल-अभिनेत्री-गायिका-नृत्यांगना आणि प्राणीमित्र ब्रिगेट बार्दोत (पॅरीस), वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रिमीयर मार्क मॅकगोवन, सुप्रसिध्द टेनिस खेळाडू स्टेफी ग्राफ, नोबेल पुरस्कार विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अभिजित बॅनर्जी (अमेरिका) या परदेशी व्यक्तींच्या पत्रांचा समावेश आहे.

## जिल्हा परिषदेसाठी 41 तर पंचायत समितीसाठी 83 अर्ज

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक 21 जानेवारी होता. पनवेलमधून जिल्हा परिषदेचा आठ गणासाठी 41 आणि पंचायत समितीच्या 16 गणासाठी 83 उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी 5 फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. तालुक्यात एकूण 346 मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. पनवेल मधून भाजप विरुद्ध शेकाप अशीच मुख्य लढत होणार आहे. 2017 च्या निवडणुकीनंतर भाजप आणि शेकापमध्ये अनेकांनी पक्षांतर केला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद गणामध्ये आणि पंचायत समितीमध्ये भाजप सत्ता काबीज करेल ही शेकाप सत्तेवर येईल हे मतमोजणीनंतर 7 फेब्रुवारी रोजी समजणार आहे.

# समस्यांची सोडवणूक करीत स्वत:ला विकसित करा - डॉ. जी. एस. नटराजन यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

## विद्यापीठात 'क्रिटिकल थिंकिंग अँड प्रॉब्लेम सॉल्विंग स्किल्स' विषयावर ३ दिवसीय कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** प्रत्येक दिवशी येणाऱ्या समस्येचे गांभीर्यपूर्वक चिंतन, मननातून सोडवणूक करीत स्वतःला विकसित करा, असे आवाहन एलआयटीचे माजी संचालक डॉ. जी. एस. नटराजन यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'क्रिटिकल थिंकिंग अँड प्रॉब्लेम सॉल्विंग स्किल्स' या विषयावर ३ दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. श्रीनिवास रामानुजन सभागृहात कार्यशाळेचा उद्घाटन कार्यक्रम गुरुवार, दि.२२ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. यावेळी डॉ. नटराजन बोलत होते.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान पुरस्कृत विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी), पदव्युत्तर मानसशास्त्र विभाग, भाषिक आणि भारतीय भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २२ ते २४ जानेवारी दरम्यान आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनिय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून एलआयटीचे माजी संचालक डॉ. जी. एस. नटराजन, आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे, पदव्युत्तर मानसशास्त्र विभागातील डॉ. सुबोध बनसोड, भाषिक आणि भारतीय भाषा विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र कुमार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.


शिक्षण तसेच संशोधन कार्य करीत असताना 'क्रिटिकल थिंकिंग आणि प्रॉब्लेम सॉल्विंग कौशल्य' असणे महत्त्वपूर्ण




असल्याचे पुढे बोलताना डॉ. नटराजन यांनी सांगितले. पदव्युत्तर पदवी आदी विविध शिक्षण पूर्ण करण्यासोबतच मानसिक आरोग्य देखील बळकट करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यासाठी क्रिटिकल थिंकिंग करण्याची आवश्यकता आहे. सोबतच यातून विविध उभ्या ठाकलेल्या समस्यांची सोडवणूक करावी लागणार आहे. या सोबतच त्यांनी एलआयटी, विद्यापीठ भाषिक आणि भारतीय भाषा विभागात सेवानिवृत्तीनंतर देखील सेवा देत असल्याचे सांगितले. संपूर्ण शैक्षणिक कार्यकर्दीचा आढावा त्यांनी त्यांच्या भाषणातून घेतला.

अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मार्गदर्शन करताना समस्यांची सोडवणूक करण्याकरिता गांभीर्यपूर्व विचारांची गरज असते. त्यासाठी या कार्यशाळेचा उपयोग होईल, असे सांगितले. संशोधन करताना प्रश्न विचारण्यास सुरुवात करा. इतरांना प्रश्न विचारण्याऐवजी स्वतःला प्रश्न विचारल्यास संशोधन कार्यात त्याचा अधिक उपयोग होतो, असे डॉ. कोरेटी यांनी सांगितले. या कार्यशाळेच्या माध्यमातून जीवन कौशल्याचे शिक्षण मिळणार आहे. शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्य सुदृढ असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे यांनी कार्यशाळेबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण व्हावी या दृष्टीने प्रधानमंत्री उच्च तर शिक्षा अभियान अंतर्गत कार्यशाळेला आर्थिक मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. ३ दिवस या कार्यशाळेत संशोधनाच्या अनुषंगाने विविध तज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे. कार्यशाळेला विविध विभागातील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## रांजणपाडा येथे माघी गणेशोत्सव उत्साहात



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** माघी गणपती निमित्त पंडित उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांच्या वतीने रांजणपाडा (खारघर) येथे भव्य गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या पवित्र सोहळ्यासाठी परिसरातील तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. हजारो भाविकांनी श्री गणरायाचे दर्शन घेऊन मनोभावे पूजाअर्चा केली.

या गणेशोत्सवाच्या काळात संपूर्ण रांजणपाडा परिसर भक्तिमय वातावरणाने नटला होता. भक्तांसाठी दर्शनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. तसेच दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे चौधरी कुटुंबीयांच्या वतीने आदरपूर्वक स्वागत करण्यात आले. भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. माघी गणपती हा भक्तांच्या श्रद्धेचा आणि विश्वासाचा केंद्रबिंदू असून, या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवामुळे सामाजिक एकोपा आणि भक्तिभाव अधिक दृढ झाला. या उत्सवानिमित्त नवदुर्गा महीला प्रासादिक भजन मंडळ कोपरा, आणि हनुमान प्रासादिक भजन मंडळ पळस्पे यांचे भजन, प्रख्यात सितारवादक पं.मारूती पाटील यांचे सतारवादन तसेच पं.उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन कार्यक्रमे आयोजित करण्यात आली होती.

गणेशोत्सव यशस्वी होण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे पंडित उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी आभार मानले.

# जैविकतंत्रज्ञान क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी ! :- शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत

## जयभवानी महाविद्यालयात "करिअर इन बायोटेक्नॉलॉ फिल्ड "विषयावर कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** जागतिकीकरणात जैविकतंत्रज्ञान, बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रात भरपूर संधी निर्माण झाल्या आहेत. असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे भूमीपुत्र तथा इस्राईल येथील आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांनी केले. ते पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित "करिअर इन बायोटेक्लॉजी फिल्ड" या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की २० व्या शतकात जैविकतंत्रज्ञानाचा उदय झाला व अतिशय वेगाने विकास झाला आज जागतिक स्तरावरील सर्वच देशात सर्व क्षेत्रात जैविकतंत्रज्ञाना वापर केला जात आहे. शेती, बी- बियाणे, मेडिकल



क्षेत्रात जैविकतंत्रज्ञान ही गरज निर्माण झाली आहे. तेव्हा युवकानी करिअर साठी जैविकतंत्रज्ञान क्षेत्रात जावे भरपूर संधी आहेत असे अहवान केले. तसेच संशोधन क्षेत्रात ही भरपुर वाव आहे हे त्यांनी पीपीटी च्या आधारे अतिशय सोप्या भाषेत माहिती सांगितली. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते. तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक व कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांची उपस्थिती होती. पाहुण्यांचा परिचय व प्रस्ताविक वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.बाळासाहेब जोशी यांनी केले. तर प्रा.विनोद किर्दक व प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी जैविकतंत्रज्ञान ही काळाजी गरज असल्याचे सांगितले. तर प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की जैविकतंत्रज्ञान या महत्वाच्या विषयासंबधी विद्यार्थांना ज्ञान मिळावे व त्या क्षेत्रातील एक संशोधक यांच्या बरोबर विद्यार्थ्यांना चर्चा करता यावी म्हणुन या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. तसेच आपल्या जिल्ह्याचे भूमीपुत्र इस्राईल सारख्या प्रगत देशात संशोधक म्हणुन काम करतात याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे. असे सांगुन या क्षेत्रात करिअर करावे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा.शिवाजी भोरे यांनी केले. तर आभार प्रा.आनंद भगत यांनी व्यक्त केले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद, बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. ही एक दिवसीय कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन समिती व प्रा. डॉ.बंडू लोखंडे, प्रा.डॉ.अशोक देवगुडे, प्रा.डॉ. गोविंद बामदळे, प्रा.शेख खैसर, प्रा.बजरंग डिसले, प्रा.नारायण फुन्ने, प्रा.पापाजी चव्हाण व ग्रथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यशाळेचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.

# प्रतिकूल परिस्थीतीवर मात करत शेतमजुराचा मुलगा झाला वन सर्वेअर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी /सय्यद ईसा :** जगाच्या स्पर्धेत शिक्षणाची दारे खुली झाली असल्याने माहूर सारख्या अतिदुर्गम भागातील विद्यार्थी सुद्धा आपल्या बुद्धीमतेच्या जोरावर जगाच्या स्पर्धेत भरारी घेत असून तालुक्यातील वानोळा सारख्या अतिदुर्गम आदिवासी बहुल, डोंगराळ भागातील शेतमजुर नुरसिंग गोबरा जाधव यांचा मुलगा कार्तिक नुरसिंग जाधव याने वनविभाग कोल्हापूर च्या सरळसेवा भरती प्रक्रियेत वन सर्वेअर गट क पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत प्रवेश रुजू झाला आहे.

कार्तिकने प्राथमिक शिक्षण जि.प.प्रा. शाळा वानोळा येथे घेतले असून माध्यमिक शिक्षण वसंतराव नाईक विद्यालय वानोळा



येथे घेतले तर उच्च माध्यमिक शिक्षण कॉलेज महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय गोकुंदा ता किनवट येथे घेतले तर वन सर्वेअर पदविका शासकीय औधोगिक प्रशिक्षण संस्था गुंज ता.महागाव येथुन पूर्ण केली.

शासकीय सेवेत जाण्याचे ध्येय बाळगत गेल्या तीन वर्षांपासून किनवट येथे अभ्यासिकेमध्ये अहोरात्र अभ्यास करत शासकीय नोकर भरतीत अर्ज करून प्रयत्न चालू ठेवले व यश संपादन केले आहे. अभ्यासातील सातत्य व गुरुजनांचे व आई वडिलांचे मार्गदर्शन व आशीर्वाद हेच माझ्या यशाचे गमक असल्याचे यांनी संगितले असून नौकरी करत लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन प्रशासन सेवेत सहभागी होण्याचा मानस कार्तिक जाधव यांनी बोलतांना व्यक्त केला.

**प्रतिकूल परिस्थितीवर मात**

आई वडील जेमतेम शिकलेले,१ एकर शेती निसर्गाचा मिळणारा दगा, या खडतर परिस्थिती जिद्दीने बदलण्यासाठी शिक्षण हाच मार्ग असल्याचे कार्तिक ने ओळखले आणि अभ्यासातील सातत्य व आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधनांचा पुरेपूर उपयोग करत गरीब परिस्थितीतही शासकीय सेवेत दाखल होण्याचे स्वप्न शक्य झाले असल्याचे कार्तिक ने सांगितले.

# नांदेड येथे होणाऱ्या गोल्ला गोलेवार यादव समाजाच्या मेळाव्यास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे नामदेवराव आयलवाड यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/माधव काईतवाड बोरगडीकर :** दिनांक 24 जानेवारी 2026 रोजी शनिवारी गोल्ला गोलेवार यादव समाज सेवा संघटना जिल्हा नांदेड च्या वतीने सदर मेळाव्याचे आयोजन केले असून या मेळाव्यामध्ये विविध उपक्रम राबविले जाणार असून होत असलेल्या मेळाव्यास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रदेशाध्यक्ष नामदेवराव आयलवाड यांनी केले आहे.

सदरील मेळावा आर्य वैश्य मंगल कार्यालय वासवी माता लातूर फाटा सिडको नांदेड येथे सकाळी 11 वाजता होत असून मेळाव्यामध्ये उपवधू वर परिचय मेळावा,तसेच सुशिक्षित बेरोजगार मेळावा, समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा



सत्कार ,महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम, त्याचबरोबर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार, प्रगतिशील शेतकऱ्यांचा सत्कार ,यशस्वी उद्योजकांचा सत्कार तसेच पदोन्नत कर्मचाऱ्यांचा सत्कार ,आणि पीएचडी सेट नेट धारकांचा सत्कार, समाज भूषण पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित केला आहे.

मेळाव्यास समाजातील किंबहुना जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन गोल्ला गोलेवार यादव समाजाचे प्रदेशाध्यक्ष नामदेवराव आयलवाड यांनी केले आहे

> हिमायतनगर तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी जास्तीत-जास्त संख्येने गोल्ला-गोलेवार यादव समाज जिल्हा नांदेड च्या मेळाव्यास उपस्थित राहवे.
> - पवन करेवाड सिरंजनीकर

## पनवेल महानगरपालिकेचे महापौरपद 'ओबीसी' (नागरिकांचा मागास प्रवर्ग) प्रवर्गासाठी; भाजप उमेदवारांमध्ये चुरस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेचे महापौरपद 'ओबीसी' (नागरिकांचा मागास प्रवर्ग) प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने राजकीय चुरस शिगेला पोहोचली आहे. या पदासाठी एकापेक्षा एक दिग्गज नावे चर्चेत असली, तरी अंतिम मोहोर कोणावर उमटणार, याचा सर्वस्वी निर्णय आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे वरिष्ठ नेते घेणार आहेत. त्यांच्या या निर्णयाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.सध्या निवडून आलेल्यांमध्ये ॲड मनोज भुजबळ, अमर पाटील, नितीन पाटील, प्रविण पाटील, आणि ममता प्रितम म्हात्रे ओबीसी' प्रवर्गामधून निवडून आले आहे. या सर्व दिग्गजांपैकी एकाला महापौरपद दिल्यास, इतरांना 'सभागृह नेते' पद दिले जाण्याची शक्यता आहे. सभागृह नेतेपद हे महापौर पदाच्या दर्जाचेच असल्याने, सत्तेचा समतोल राखण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर नेमकी काय रणनीती आखतात, हे महत्त्वाचे ठरेल.पनवेलच्या विकासाचा वेग कायम राखण्यासाठी आणि महापालिकेवर वचक निर्माण करण्यासाठी अनुभवी नेत्याला संधी द्यायची की नव्या दमाच्या चेहऱ्याला, याचा पेच वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत सुटणार आहे. आगामी काही दिवसांत आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून नावांची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीतर्फे एकूण १८ उमेदवार निवडून आले असले तरी त्यांच्याकडे संख्याबळ पुरेसे नसल्याने त्याचप्रमाणे कोणतेही राजकीय भूकंप होण्याची शक्यता नसल्याने भाजपला मार्ग सुकर आहे.

# रक्तदान हे जीवनदान - डिगांबर बोराडे तालुका प्रमुख युवासेना मंठा

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र/राजु शिंदे :** रक्तदान हेच श्रेष्ठ दान असुन रक्तदानामुळे एखाद्याला जीवनदान मिळते त्यामुळे रक्तदान करा असे आवाहन युवासेना तालुकाप्रमुख डिगांबर बोराडे यांनी केले हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त मंठा येथे युवासेनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते मंठा युवा सेनेच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक दि.22 गुरुवार रोजी भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले यावेळी गोपी गायकवाड युवासेना शहर प्रमुख मंठा, अशोक घारे युवासेना उप तालुका प्रमुख मंठा,मनु गिरी युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, आवेश पठाण युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, दत्तात्रय काळे युवासेना तालुका सचिव मंठा, संतोष शेंडगे युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, विष्णु बहाड युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, सिद्धेश्वर खंदारे युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, विकास शेळके युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, ज्ञानेश्वर खरात युवासेना उप शहर प्रमुख मंठा,भारत भुसारे युवासेना सोशल मीडिया तालुका प्रमुख मंठा,




गोपाळ खंदारे युवासेना विभाग प्रमुख, ज्ञानेश्वर खंदारे युवासेसैनिक , यांच्यासह आदी युवा सैनिक उपस्थित होते या वेळी लोकमान्य ब्लड बँकेच्या डॉक्टर कर्मचाऱ्यांनी रक्तदात्यांचे रक्तसंकलन केले यावेळी डिगांबर बोराडे म्हणाले की एखाद्या अपघातग्रस्त व्यक्तीला गरोदर महिलेला कॅन्सर किंवा थॅलेसेमिया रुग्णाला जिवंत राहण्यासाठी रक्ताची गरज असते अशा वेळी आपण दिलेले काही थेंब रक्त एखाद्याचे संपूर्ण जीवन वाचवू शकते,याहुन मोठे पुण्याचे काम दुसरे कुठलेच नाही आपल्या देशात रोज हजारो रुग्णांना रक्ताची गरज भासते पण त्या तुलनेत रक्तदात्यांची संख्या खूपच कमी आहे.

त्यामुळे समाजात रक्तदानाविषयी जागृती करणे ही आपली सामुहिक जबाबदारी असल्याचे डिगांबर बोराडे म्हणाले..

# अवघ्या तासाभरात मोबाईल परत : अंभोरा पोलिसांची जलद आणि संवेदनशील कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**बाळासाहेब रकटाटे / आष्टी प्रतिनिधी :** पोलीस केवळ कायदा-सुव्यवस्था राखण्याचे काम करत नाहीत, तर गरजूंना मदतीचा आधार देतात, हे पुन्हा एकदा अंभोरा पोलीस ठाण्याच्या तत्पर कारवाईतून दिसून आले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथून आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे मजुरीसाठी आलेल्या एका मजुराचा मोबाईल बुधवारी दुपारी अचानक चोरीला गेला. मोबाईल हरवल्यामुळे त्यांची मोठी अडचण निर्माण झाली. कारण तो मोबाईलच त्यांच्या कुटुंबाशी संपर्क ठेवण्याचे प्रमुख साधन होते.

घटनेनंतर संबंधित व्यक्तीने तात्काळ अंभोरा पोलीस



ठाण्यात धाव घेऊन आपली तक्रार नोंदवली. पोलीस ठाणे गाठेले आणि सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरित तपास सुरू केला.

तांत्रिक माहिती व खात्रीशीर तपासाच्या आधारे पोलिसांनी अवघ्या एका तासाच्या आत चोरीला गेलेला मोबाईल शोधून काढत तो संबंधित मजुराकडे सुपूर्द केला.समाधानाने व्यक्त केले आभार

मोबाईल परत मिळाल्यानंतर मजुराच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. त्यांनी हात जोडून पोलिसांचे आभार मानले.

“नागरिकांचे समाधान हेच आमच्या कामाचे खरे यश आहे. अंभोरा पोलीस ठाणे नागरिकांच्या सेवेसाठी सदैव सज्ज आहे,” असे मत एपीआय मंगेश साळवे यांनी यावेळी व्यक्त केले.

# महादेव उप्पे यांना ग्राहक रक्षक समिती तर्फे राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार जाहिर

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/ महादेव उप्पे देगलूर :** मागील अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात व समाजसेवेची आवड असणारे माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिस मित्र समिती नांदेडचे जिल्हाध्यक्ष तथा दैनिक मराठवाडा नेता वृतपत्राचे तालूका प्रतिनिधी महादेव शरणप्पा उप्पे रा.हणेगाव तालूका देगलूर जिल्हा नांदेड यांना नुकताच भारत सरकार आणि निती आयोग नोंदणीकृत ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था संचलित ग्राहक रक्षक समिती तर्फे सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार २०२६ साठी नुकतीच निवड करण्यात आली असून याचबरोबर नांदेड जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी पार पाडावी म्हणून महादेव उप्पे यांची नांदेड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.हि निवड ग्राहक रक्षक समितीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. सौ.आशाताई पाटील नाशिक यांनी केली असून तशा प्रकारचे निवड पत्र महादेव उप्पे यांना प्राप्त झाले आहे.

त्यांना हा सन्मान दि.०८ फेब्रूवारी २०२६ रोजी सेलिब्रिटी हॉटेल अंध शाळा बस स्टॉप समर्थ बाजार जवळ नाशिक रोड नाशिक येथे आयोजित करण्यात आला आहे.या पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे.हा पुरस्काराने मिळाल्याबद्दल देगलूर तालुक्यातील पत्रकार क्षेत्रातील



ॲड.सद्दाम दावणगीरकर, प्रसेनजित दावणगीरकर,उमर मौजम फारुखी,श्रीनिवास बिरादार,सतिश बिरादार,नंदकुमार वलकले व अनेक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विलास फडके यांनी उमेदवारी अर्ज केला दाखल

**दैनिक युवक आधार**



**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील आदई पंचायत मतदार संघातून शेकापचे रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास फडके यांनी आपला उमेदवारी अर्ज पनवेल तहसील कार्यालयात भरला. याच वेळी नेरे जिल्हा परिषद मतदार संघातून मारुती बाळाभस्मा यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.तर नेरे पंचायत समिती मतदार संघातून हेमा धर्मावाघ यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना माजी आमदारबाळाराम पाटील, पनवेल विधानसभेचे अध्यक्षआणि माजी सभापती काशिनाथ पाटील,नारायण घरत आदी मान्यवर उपस्थित होतेसकाळी 11 वाजता पनवेल येथील शेतकरीकामगार पक्षाच्या कार्यालयात नेरे आदईपरिसरातील शेतकरी कामगार पक्षाचे आणिमहाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणातजमा झाले आणि तेथून भव्य अशी रॅली काढूनतहसीलदार कार्यालयाकडे केले. यावेळीबाळाराम पाटील यांनी सांगितले, रायगड जिल्हापरिषद ही नेहमीच शेतकरी कामगार पक्षाचीराहिली आहे आणि ती यापुढेही कायम ठेवण्यातआम्ही यशस्वी होऊ. ते पुढे म्हणाले, पनवेलमहानगरपालिकेमध्ये ज्या चुका आमच्याकडूनघडल्या, त्या चुका टाळण्याचा प्रयत्न आम्ही करूआणि रायगड जिल्हा परिषदेत महाविकासआघाडीची सत्ता आणू याचा आम्हाला विश्वास वाटत आहे.

# कॉपीमुक्त अभियानासाठी रायगड जिल्हा प्रशासन सज्ज

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/पंडीत फंगाळ**

**रायगड :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण महामंडळामार्फत फेब्रुवारी- मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षा दरम्यान कॉफीमुक्त, पारदर्शक व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी विशेष "कॉपीमुक्त अभियान " प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या संदर्भात मुंबई विभागीय मंडळाच्या विभागीय सचिवांनी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शन सूचना पाठवल्या आहेत. या अभियानाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, उपशिक्षणाधिकारी हेमलता गावित यांनी संयुक्तपणे शाळा प्रशासन,शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना सहभागाचे आव्हान




केले आहे.

इयत्ता १२ वीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ तर इयत्ता १० ची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. या परीक्षांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये यासाठी परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे, दक्षतापदके व केंद्रस्तरीय यंत्रणा अधिक सक्रिय करण्यात येणार आहेत. शाळांनी आवश्यक सुविधा, शिस्त व पर्यवेक्षण काटेकोरपणे राबवावे असे शिक्षण विभाग माध्यमिक मार्फत कळवले आहे.

शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान काय करावे व काय करू नये याची सविस्तर माहिती देणे, पालक - विद्यार्थी सभा घेऊन शिक्षा सूची समजावून सांगणे ,अफवांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती करणे बंधनकारक करण्यात आले आहे.सर्व शाळा शिक्षक पालक व विद्यार्थ्यांनी प्रशासनाला सहकार्य करून कॉपीमुक्त व पारदर्शक परीक्षा यशस्वी करावी. विद्यार्थी आपली गुणवत्ता सिद्ध करतील यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे असे प्रतिपादन महारुद्र नाळे यांनी केले .परीक्षा केंद्रावर स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे योग्य प्रकाश व बैठक व्यवस्था, सुरक्षित वातावरण याची पूर्तता करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# सांस्कृतिक–कलात्मक वारसा जपणारे हक्काचे व्यासपीठ : मविप्र युवास्पंदन – सभापती बाळासाहेबजी क्षीरसागर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी :** मविप्र समाजाच्या विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ देणारी आणि सांस्कृतिक-कलात्मक मूल्यांची रुजवणूक करणारी मविप्र युवास्पंदन ही चळवळ निश्चितच उद्याचे नामवंत कलावंत, गायक, संगीतकार, वक्ते, नृत्यांगना, नाटककार व दिग्दर्शक घडवेल, असा ठाम विश्वास मविप्र सभापती बाळासाहेबजी क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

मविप्र समाजाचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निफाड येथे आयोजित मविप्र युवास्पंदन प्राथमिक फेरीच्या उद्घाटन समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. परिसरातील एकूण सहा महाविद्यालयांच्या विद्यार्थी संघांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दोन दिवस चाललेल्या (२०




व २१ जानेवारी) या स्पर्धेचे उद्घाटन २० जानेवारी रोजी बाळासाहेबजी क्षीरसागर यांच्या हस्ते झाले.

यावेळी निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते, डॉ. उत्तमराव डेरले, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मनोगतात शिवाजी गडाख म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच कला व नेतृत्वगुणांचा विकास साधण्यासाठी युवास्पंदन हे मोठे व्यासपीठ असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा. डॉ. उत्तम डेरले यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या, तर प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

स्पर्धेदरम्यान शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, प्रा. शशिकांत मोगल, समन्वयक डॉ. तुषार पाटील यांनी महाविद्यालयास भेट देऊन आयोजनाचे कौतुक केले.या स्पर्धांमध्ये भारतीय समूहगायन, शास्त्रीय तालवादन व स्वरवादन, लोकवाद्यवृंद, समूह व शास्त्रीय गायन, प्रहसन नाट्यछटा, मुकानाट्य, एकांकिका, शास्त्रीय व पारंपरिक लोकनृत्य, फोटोग्राफी, पोस्टर डिझाईन, रांगोळी, मेहेंदी, वकृत्व व वादविवाद अशा विविध प्रकारांत स्पर्धकांनी यशस्वी सहभाग घेतला.

पारितोषिक वितरण मविप्र तज्ज्ञ परीक्षक सुनील भास्कर, रामेश्वर धोंगडे व प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमती एम. एल. कोटकर यांनी केले, तर आभार प्रा. प्रवीण शार्दुल व डॉ. एस. आर. जाधव यांनी मानले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी निफाड महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक-प्राध्यापिका व सेवकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शाहिर रत्न दादाराव शामराव जाधव यांना शिर्डीत 'साई जीवनगौरव समाजभूषण पुरस्कार २०२६'; छत्रपती संभाजीनगरचा मान उंचावला

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/नागपूर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा गौरव वाढवणारी अभिमानास्पद घटना शिर्डी येथे घडली असून सिल्लोड तालुक्यातील केऱ्हाळा येथील भूमिपुत्र, शाहिरी परंपरेचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व व समाजप्रबोधन करणारे आदर्श शाहिर शाहिर रत्न दादाराव शामराव जाधव यांना 'साई जीवनगौरव समाजभूषण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय पातळीवरील हा पहिला भव्यदिव्य पुरस्कार सोहळा दि. १० जानेवारी २०२६ (शनिवार) रोजी शिर्डी येथील साईबाबांच्या पावन भूमीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सुदाम संसारे सर, उपाध्यक्षा सौ. विध्या ताई ठाकुर (मुंबई), सल्लागार डॉ. माधव वानखेडे, लावणी साम्राज्ञी आकांक्षा कुंभार (सांगली), रंजना ताई बालसाने (मुंबई), सूत्रसंचालिका कु. अश्विनी ताई गोसावी,



राजनंदिनी ताई अहिरे (नाशिक), मिनाक्षी ताई अहिरे (रायगड), अभिनेत्री दुर्गाताई बावके (शिर्डी), अभिनेता आकाश वाघमारे (शिर्डी), खलनायक महेश लोखंडे (कोल्हार), आरती ताई बारवर्से (जळगाव), अभिनेता योगेश पवार (मुंबई), उपसंपादक गोकुळसिंग राजपूत (सावळदबारा), ईश्वर हिवाळे पहूर, प्रवीण ठाकरे जिल्हा अध्यक्ष अजिंठा, उपशिक्षक शंकर भामेरे पहूर, मुरलीधर विठ्ठल दाभाडे, जिल्हा अध्यक्ष गजानन काळे खुपटा,यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शाहिर दादाराव जाधव यांना मानाचा फेटा, शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व पदक देऊन गौरविण्यात आले.

मुख्य निवड समितीचे आयोजक सुदाम संसारे सर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा अभिमान असलेल्या शाहिर दादाराव जाधव यांच्या समाजप्रबोधनात्मक कार्याची दखल घेऊन त्यांना हा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्कारामुळे जिल्ह्याचा नावलौकिक वाढला आहे."

'साई जीवनगौरव समाजभूषण पुरस्कार' मिळाल्याने शाहिर दादाराव शामराव जाधव यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध सामाजिक, सांस्कृतिक व संघटनात्मक स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# आझाद मैदानात ३२४ प्रकल्पग्रस्तांचे ३ महिने बेमुदत उपोषण; शासनाच्या मुख्य सचिवांच्या बैठकीतील आदेश धूळखात

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्वोच्च पातळीवर निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या नागोठणे प्रकल्पाशी संबंधित ३२४ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रधारकांना कायमस्वरूपी नोकरी देण्याचा निर्णय होऊनही प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही न झाल्याने, संबंधित प्रकल्पग्रस्तांनी मुंबईतील आझाद मैदानात गेल्या तीन महिन्यांपासून बेमुदत उपोषण छेडले आहे.

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निर्णायक बैठकीत जिल्हाधिकारी रायगड, उद्योग विभागाचे वरिष्ठ अधिकारी, कंपनी प्रतिनिधी तसेच कामगार संघटनांच्या उपस्थितीत हा निर्णय घेण्यात आला होता. बैठकीत सात दिवसांत प्रकल्पग्रस्तांची पडताळणी करून दोन महिन्यांत कायम नोकरी देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते असे अध्यक्ष गंगाराम मिणमिणे यांनी सांगितले.

यानंतर जिल्हाधिकारी रायगड यांनी ३२४ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रधारकांची यादी तयार



करून अहवाल कंपनीकडे सादर केला. मात्र, निर्णयानंतरही रिलायन्स नागोठणे प्रकल्प प्रशासनाकडून टाळाटाळ आणि दिरंगाईचे धोरण स्वीकारण्यात आल्याचा आरोप उपाध्यक्ष रोशन जांभेकर यांनी यावेळी केला.

शासनाच्या आदेशांकडे दुर्लक्ष झाल्याने अखेर ०१ सप्टेंबर २०२४ पासून आझाद मैदानात सर्व प्रकल्पग्रस्तांच्या उपस्थितीत बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले. उपोषणाला तीन महिने पूर्ण होत असतानाही, कंपनीकडून कायमस्वरूपी नोकरीबाबत कोणताही लेखी आदेश न आल्याने आमचा संताप वाढला आहे असे राजेश जवळे, ताईबाई घासे, वनिता मालूसना, विठाबाई वाटावे, संजय मोकल, किशोर म्हात्रे, बबन शिंदे,जनार्दन भोईर यांनी केला.

कामगार संघटनांच्या मते, निर्णय कागदावरच राहिला असून प्रत्यक्षात प्रकल्पग्रस्तांवर अन्याय सुरू आहे. दीर्घकाळ चाललेल्या उपोषणामुळे उपोषणकर्त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. तरीही शासन व कंपनी प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात नसल्याने शासन निर्णयांची विश्वासार्हता आणि अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर तातडीने उच्चस्तरीय बैठक बोलावून ३२४ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरी देण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा गंगाराम मिणमिणे यांनी दिला आहे.

# श्री गुरु तेग बहादूर : मानवजातीचे खरे तारणहार

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती…

महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.

अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर



असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.

आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला – बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.

त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.

श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते – मी शीख आहे आणि शीखच राहणार!

श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे -"आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे." त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे.

त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

**अनिल आलुरकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**